रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ३५९
www.ramprahar.com

बुधवार १६ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

भाताण बोगद्यात पुन्हा अपघात; १४ जखमी/२
पनवेलमध्ये भाजपकडून ‘गडकिल्ले’ विजयोत्सव/३
युनिफाईट स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंची बाजी/८

## ’आर्थिक फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार’



**मुंबई :** राज्यातील हजारो ठेवीदारांची आर्थिक फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करताना त्याची शिक्षा आणि दंडामध्ये मोठी वाढ करण्यात येईल तसेच आरोपींच्या मालमत्तांचा शोध घेऊन त्यांचा लिलाव करण्यापर्यंतच्या प्रक्रियेत पोलिसांना साह्य करण्यासाठी तज्ज्ञांची विशेष यंत्रणा उभारली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि.१५) विधानसभेत केली. मैत्रेय ग्रुपच्या विविध कंपन्यानी राज्यातील हजारो गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याप्रकरणी अमोल खताळ, सुधीर मुनंगटीवार आदींनी उपस्थित केलेल्या प्रश्नावरील चर्चेदरम्यान फडणवीस बोलत होते. पोलिसांना मदत करण्यासाठी मुल्यांकन अधिकारी, कायदेतज्ज्ञ, वित्तीय तज्ज्ञांचा समावेश असलेली विशेष यंत्रणा तयार करण्यात येईल असेही फडणवीस यांनी सांगितले.

# रायगड जिल्ह्यालाही पावसाने झोडपले

**अलिबाग : प्रतिनिधी**

तब्बल १५ दिवसांच्या विश्रांतीनंतर मंगळवारी ( दि. १५) रायगड जिल्ह्याला पावसाने झोडपले. जिल्ह्याच्या सर्वच भागात पावसाची संततधार सुरू होती. दक्षिण रायगडमध्ये पावसाचा जोर



अधिक होता. सावित्री, कुंडलिका, अंबा या नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत होत्या. अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी साचल्याने वाहतूक बंद करण्यात आली होती. मुंबई-गोवा महामार्गाला काही ठिकाणी नदीचे स्वरूप आले होते. पावसामुळे जिल्हाधिकारी यांनी शाळांना सुट्टी जाहीर केली. दुपारनंतर मात्र पावसाचा जोर कमी झाला.



सोमवारपासून जिल्ह्यात पावसाने पुनरागमन केले. मंगळवारी पहाटेपासून पावसाने जिल्ह्याच्या सर्वच भागात हजेरी लावली. आजच्या पावसाने जनजीवन विस्कळीत झाले होते. पोलादपूर जवळ कशेडी घाटात दरड कोसळली होती. मुंबई-गोवा महामार्गावर सुकेळी खिंडीत पाणी साचले होते. भिसे खिंडीत झाड पडले होते. वरसे, भुवनेश्वर परिसरातील काही घरांमध्ये पाणी घुसले होते. महादेवखार गावाकडे रस्त्यावर दरड कोसळल्यामुळे हा मार्ग वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आला. आंबेनळी घाटात रस्त्यात दगड, माती आल्यामुळे या घाटातील वाहतूक तात्पुरती बंद ठेवण्यात आली होती.

नागोठणे रेल्वे पुलाखालील रस्त्याचीदेखील तीच अवस्था होती. वाकण ते नागोठणेदरम्यानचा रस्ता जलमय झाला होता. **(पान २ वर..)**

### महामार्ग झाला जलमय

पावसाने मुंबई-गोवा महामार्गाच्या महामार्गावर ठिकाठिकाणी पाणी साचल्याने नदीचे स्वरूप आले होते. खांब गावाजवळ महामार्गावर ५०० लांबपर्यंत रस्त्यावर पाणी साचले होते. त्या ठिकाणी रस्त्याला नदीचे स्वरूप आले होते. पाण्यातून वाट काढताना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत होती. त्यामुळे खांबच्या उड्डाण पूलावर वाहतूक कोंडी झाली होती.

### ‘रायगड’चा पायरी मार्ग बंद

महाड तालुक्यात मुसळधार पावसामुळे सावित्री, गांधारी व काळ या प्रमुख नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आणि शहरात पूरपरिस्थिती निर्माण झाली. शिंगरकोड येथील सुरेश गणपत भोसले (वय ५८) हे गावाजवळून जाणाऱ्या नदीमध्ये पाय घसरून मयत झाले. दरम्यान, पर्यटकांसाठी किल्ले रायगड पायरी मार्ग १५ ऑगस्टपर्यंत बंद ठेवण्यात आला आहे.

### नद्या धोका पातळीच्यावर

रायगड जिल्ह्यातून वाहणाऱ्या अंबा, कुंडलिका आणि सावित्री या तीनही प्रमुख नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली होती. पावसाची संततधार आणि महाबळेश्वर येथे कोसळणाऱ्या पावसामुळे सावित्री नदी दुथडी भरून वहात होती. अंबा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाल्याने नागोठणे एसटी स्थानक परीसर जलमय झाला होता. रोहा शहराच्या अनेक भागात पावसाचे पाणी साचलेले.

### सीसीटीव्ही कॅमेरा प्रणालीसंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांचा विधानसभेत प्रश्न

# एकत्रित एसओपी लवकरच जाहीर करणार -मुख्यमंत्री

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीसीटीव्ही कॅमेरे कुठेही अनियंत्रितपणे बसवले जातात, त्यासाठी कोणत्या निधीतून खर्च झाला, देखभाल-दुरुस्ती कोण करणार याचे नीट नियोजन नसते. हे लक्षात घेऊन राज्यातील सीसीटीव्ही प्रकल्पांसाठी एक एकत्रित एसओपी (Standard Operating Procedure) तयार करून लवकरच जाहीर केले जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिले. वीज, पाणी महत्वाचे आहे तसेच सुरक्षितता महत्वाची झाली आहे त्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील नगरपालिकांमध्ये सीसीटीव्ही संरक्षण आराखडा तयार झाला पाहिजे आणि त्यासाठी प्रशासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळात अधोरेखित करून मागणी केली. त्या अनुषंगाने सकारात्मक कार्यवाही करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आश्वासित केले.







रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील शहरी भागात बसविण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांची दुरुस्ती करण्याबाबत पेण विधानसभा मतदार संघाचे आमदार रवीशेठ पाटील यांनी तारांकित प्रश्न दाखल केला होता. त्या अनुषंगाने आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपप्रश्न सभागृहात उपस्थित केला. पाणी, वीज अत्यंत महत्वाचा भाग आहे त्याचप्रमाणे सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही संरक्षण आराखडा सुद्धा आता काळाची गरज बनलेली आहे, त्यामुळे रायगड जिल्ह्यातील सर्व नगरपालिकांमध्ये सीसीटीव्ही संरक्षण आराखडा बनवण्यासाठी पोलीस प्रशासनाने शासनाला सूचित करावे, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधासभेत प्रश्नोत्तराच्या तासात केली. आमदार प्रशांत ठाकूर यांनी, रत्नागिरी जिल्ह्यातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्यास तेथील पोलीस अधीक्षक संबंधित सीसीटीव्ही कंपनीला सूचना देतात तसेच त्यांना दंड आकारतात. त्याप्रमाणे रायगड जिल्हा पोलीस अधीक्षकांनीही तशी कारवाई करण्यास हरकत नाही, असे सभागृहात सूचित केले. त्यांनी खोपोलीमधील कॅमेरा प्रणालीचा विषय घेत त्या ठिकाणी ४० टक्के कॅमेरे कार्यरत नाहीत मग असे कॅमेरे लावून उपयोग काय असा सवाल करून ज्या कंपनीने हे सीसीटीव्हीचे काम केले आहे त्यांच्यावरती कॅमेरे कार्यरत नसल्याबद्दल दंड आकारणार का? आणि ज्या कंपनींनी नगरपालिका यंत्रणेला वेठीस धरले आहे त्यांना काळ्या यादीत टाकणार का असा सवाल उपस्थित केला.

सभागृहात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हंटले कि, सध्या कोणीही कुठेही सीसीटीव्ही कॅमेरे बसवतात. हे नेमके कुठल्या निधीतून केले आहे याची माहिती नसते, तसेच त्या कॅमेर्यांचे देखभाल-दुरुस्ती काम कुणी करायचे याचाही स्पष्ट उल्लेख नसतो. यासंदर्भात कालच्या बैठकीत एकत्रित एसओपी (Standard Operating Procedure) तयार करण्याच्या दृष्टीने चर्चा झाली. पुढे कोणतेही सीसीटीव्ही कॅमेरे बसवताना त्या ठिकाणी एकच अधिकृत परवानगी (single point permission) प्रणाली असेल. **(पान २ वर..)**

## निवडक

### नवजात बाळाला बसमधून फेकले; परभणीतील प्रकार

**परभणी :** पुण्याहून परभणीला जाणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्समध्ये १९ वर्षीय तरुणीने नवजात बाळाला कपड्यात बांधत गाडीच्या बाहेर फेकून दिल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. महिला नुकतीच प्रसूत झाली होती. पुण्याहून परभणीला येणाऱ्या परभणीच्या पाथरी तालुक्यातील देवनांद्रा परिसरात हा प्रकार घडला असून पोलिसांनी ट्रॅव्हल्सचा पाठलाग करत दोघांना ताब्यात घेत महिलेला रुग्णालयात दाखल केले.

### नागरी सेवा मुख्य परीक्षेचे वेळापत्रक अधिकृतपणे जाहीर

**पुणे :** यूपीएससीमार्फत घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षार्थींसाठी केंद्रीय लोकसेवा आयोगाने नागरी सेवा मुख्य परीक्षा, २०२५ चे वेळापत्रक अधिकृतपणे जाहीर केले आहे. सविस्तर वेळापत्रक आयोगाचे अधिकृत संकेतस्थळ upsc.gov.in वर प्रसिद्ध करण्यात आले आहे. नागरी सेवा मुख्य परीक्षा २२, २३, २४, ३० आणि ३१ ऑगस्ट २०२५ या कालावधीत दोन सत्रांत घेण्यात येणार आहे.

# भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला १८ दिवसांनंतर पृथ्वीवर परतले



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात १८ दिवस राहिल्यानंतर मंगळवारी (दि.१५) भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांच्यासह चारही अंतराळवीर पृथ्वीवर सुखरुप परतले आहेत. ‘क्सिओम-४’ या अंतराळ मोहिमेतील सदस्य १८ दिवस आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात राहिले आहेत.

शुभांशू शुक्ला यांच्यासह चारही अंतराळवीरांचं अंतराळयान कॅलिफोर्नियातील एका समुद्रात लँडिंग झालं आहे. हे चारही अंतराळवीर पृथ्वीवर सुखरुप परतले आहेत. त्यानंतर आता या अंतराळवीरांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. या सर्वांनी ही मोहीम यशस्वी पार पडल्याबद्दल आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाचा निरोप घेत असताना शुक्ला भावुक झालेले पाहायला मिळाले होते. अंतराळातून भारत खूपच चांगला दिसतो. एक अविश्वसनीय प्रवास होता. मोहिमेत सहभाग असलेल्या लोकांमुळे तो अद्भुत आणि अविश्वसनिय बनला, असे शुक्ला त्यांच्या निरोपाच्या भाषणात म्हणाल होते.

### पंतप्रधान मोदींकडून स्वागत

पंतप्रधान मोदी यांनी एक्सवर (ट्विटर) पोस्ट करत शुक्ला यांचे स्वागत केले आहे. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला भेट देणारे भारताचे पहिले अंतराळवीर म्हणून, त्यांनी त्यांच्या समर्पण, धैर्य आणि अग्रगण्य भावनेने अब्जावधी स्वप्नांना प्रेरणा दिली. हे आपल्या अंतराळ उड्डाण मोहिमेच्या दिशेने आणखी एक मैलाचा दगड आहे, असे पंतप्रधान यांनी म्हटले आहे.

## कोअर कमिटीची बैठक





**मुंबई : कॅबिनेट मंत्री व भाजप रायगड जिल्हा संपर्क मंत्री आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली रायगड जिल्हा भाजपच्या कोअर कमिटीची बैठक मंगळवारी झाली. या बैठकीत संघटनात्मक कामकाजाचे नियोजन व त्याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीस भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविशेठ पाटील, आमदार महेश बालदी, माजी आमदार पंडित पाटील तसेच उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी उपस्थित होते.**

# कोपर येथे बहुउद्देशीय सभागृहाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण ग्रामपंचायतीअंतर्गत कोपर येथे आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नांमुळे बहुउद्देशीय सभागृह उभारण्यात आले असून याचे काम पुर्ण झाले आहे. त्यानुसार या सभागृहाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी (दि.१५) झाले.

उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या सातत्यापुर्ण पाठपुरव्यामुळे २५-१५ निधीमधून कोपर येथे बहुउद्देशीय सभागृह बांधण्याचे काम मंजुर झाले होते. त्याअंतर्गत ५० लाख रुपयांचा निधी खर्चून हे काम पुर्ण झाले असून याचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.



दरम्यान, या वेळी या बहुउद्देशिय सभागृहात विविध साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी गव्हाण ग्रामपंचायत १४ लाख रुपयांचा निधी देणार असल्याचे जाहीर करण्यात आले. या सभागृहाच्या उद्घानावेळी ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, न्हावा ग्रामपंचायतीचे सरपंच विरेंद्र पाटील, सदस्य सागर ठाकूर, माजी सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, सदस्या योगीता भगत, भाजप नेते जितेंद्र म्हात्रे, हेमंत ठाकूर, वामनशेठ म्हात्रे, अनंता ठाकूर, सुधीर ठाकूर, किशोर पाटील, कोपर गाव अध्यक्ष वैभव घरत, अण्णा घरत, भाऊ भोईर, रघुनाथ देशमुख, सुभाष देशमुख, दर्शन भोईर, गजानन घरत, दयानंद घरत, कैलास घरत, किशोर पाटील, जयश्री घरत, ग्रामसेवक विजयकुमार राठोड, युवासेना जिल्हा प्रमुख मनोज घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# राज्यातील अनधिकृत कत्तलखान्यांवर कारवाईचे आदेश -मंत्री उदय सामंत



**मुंबई : प्रतिनिधी**

मालेगावसह राज्यातील सर्वच अनधिकृत कत्तलखान्यांवर कारवाईचे आदेश देण्यात येत असल्याची माहिती मंत्री उदय सामंत यांनी विधान परिषदेत दिली.

मालेगाव येथील अनधिकृत कत्तलखान्यांच्या संदर्भात विधानपरिषदेत सदस्य विक्रांत पाटील यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्री सामंत बोलत होते.

मंत्री सामंत म्हणाले की, मालेगावमधील कुरेशी मोहल्ला ते सरदार चौक या भागात कत्तलखान्यांची स्थिती चिंताजनक आहे. अनधिकृतपणे चालणाऱ्या कत्तलखान्यांवर कारवाई करणे अपेक्षित असून, काही ठिकाणी कारवाई झाली आहे. यासंदर्भात पोलिस प्रशासनाला आणखी कडक सूचना दिल्या जातील आणि जेथे अवैध कत्तलखाने सुरू आहेत, तिथे तातडीने कारवाई करण्यात येईल.

सणांच्या दिवशी महानगरपालिका व नगरपालिकांच्या माध्यमातून काही ठिकाणी तात्पुरते कत्तलखाने उभारले जातात. अशा ठिकाणी वाळू-मातीचा वापर करून रक्तवाहन थांबवण्याची काळजी घेतली जाते, असेही मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले.

मोसम नदीत रक्तमिश्रित पाणी सोडल्याचा पुरावा सदर झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी सभागृहात चुकीची माहिती दिल्याबद्दल चौकशी करून कारवाई केली जाईल. मोसम नदीच्या संवर्धनासाठी राज्य सरकारने १० कोटी ५२ लाख रुपयांचा निधी मंजूर केला असून त्यातील पाच कोटी २६ लाख रुपये मालेगाव महानगरपालिकेला देण्यात आले आहेत, असेही मंत्री सामंत यांनी सांगितले.

# भारतात ‘टेस्ला’ची अधिकृत एंट्री

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र देशातले सर्वात मोठे इलेक्ट्रिक वाहन उत्पादन क्षमता असलेले राज्य ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टेस्ला एक्सपीरियन्स सेंटरच्या उद्घानावेळी व्यक्त केला.


जगप्रसिद्ध इलेक्ट्रिक कार निर्माता टेस्लाने भारतीय बाजारात प्रवेश केला आहे. मुंबईत त्यांच्या पहिल्या एक्सपीरियन्स सेंटरचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. या वेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, मुख्यमंत्री यांचे विशेष कार्यकारी अधिकारी कौस्तुभ धवसे व टेस्ला कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रासाठी आणि विशेषतः मुंबईसाठी ही आनंदाची गोष्ट आहे, की जगातील सर्वात स्मार्ट कार भारतात येत आहे. याची सुरुवात महाराष्ट्रातून होत असून केंद्राच्या माध्यमातून टेस्लाने भारतात आपली सुरुवात करत असल्याची अधिकृत घोषणा केली आहे.

# पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर वाहतूक कोंडीवर नियंत्रण येईल- मंत्री सामंत

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रातील सुरू प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर राज्यातील वाहनांची गर्दी, वाहतूक कोंडी यावर मोठ्या प्रमाणात नियंत्रण येईल, असे मंत्री डॉ.उदय सामंत यांनी आज विधान परिषदेत सांगितले. सदस्य सत्यजित तांबे यांनी राज्यातील वाहतूक कोंडी, चुकीची चलने, पोलिसांची कारवाई आणि मोठ्या शहरांतील प्रकल्पांसंदर्भात अर्धा तास चर्चेच्या सूचना मांडल्या होत्या, त्यास मंत्री डॉ.सामंत यांनी उत्तर दिले.



मंत्री डॉ .सामंत म्हणाले की, वाहतूक कोंडी ही मुंबईसह सर्व मेट्रो शहरांमध्ये मोठी समस्या झाली आहे. यावर तोडगा काढण्यासाठी मागील महिन्यांत तीन बैठकांचे आयोजन करण्यात आले. एक बैठक उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. गृहविभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव इक्बाल चहल यांच्या नेतृत्वाखाली राज्यस्तरीय उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून, समितीने २० दिवसांत गृह व परिवहन विभागाला अहवाल सादर करावा, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

गाडी पार्किंगमध्ये असतानाही चलन मिळतात, हे गंभीर प्रकार आहेत. त्यांचीही चौकशी सुरु आहे. कोणी आणि कुठे कॅमेरे लावले, याची माहिती घेतली जात आहे, असे मंत्री डॉ.सामंत यांनी सांगितले. वाहनांची वाढती संख्या देखील वाहतूक कोंडीस कारणीभूत ठरत असल्याचे मंत्री डॉ.सामंत यांनी नमूद केले.

आजपर्यंत महाराष्ट्रात ४ कोटी ९५ लाख वाहने नोंदवण्यात आली आहेत. फक्त मुंबईत दररोज ७९४ नव्या वाहनांची नोंद होते. यामुळेच मुंबई, पुणे, नागपूर यांसारख्या शहरांत मेट्रो जाळ्याचा विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असेही त्यांनी सांगितले. राज्यात मेट्रो प्रकल्पांची प्रगती सांगताना त्यांनी स्पष्ट केले की, मुंबईत ३९३.७६ किमी, पुण्यात १३६.४२ किमी आणि नागपुरात ८३.८२ किमी लांबीचे मेट्रो प्रकल्प साकारले जात आहेत. हे पूर्ण झाल्यानंतर सुमारे १.५ ते २ कोटी लोक दररोज मेट्रोने प्रवास करतील. मुंबईतील सागरी किनारा रस्ता हा ऐतिहासिक प्रकल्प असल्याचे सांगत सामंत म्हणाले की, पूर्वी वांद्र्याहून नरिमन पॉईंटला पोहोचायला दीड ते दोन तास लागायचे, आता तोच प्रवास १७–१८ मिनिटांत होतो.

पुढे बोलताना मंत्री डॉ. सामंत यांनी सांगितले की, शहरांत. सकाळी ७ ते रात्री १० या वेळेत शहरांतून अवजड वाहने जाऊ नयेत, यासाठी विशेष निर्देश देण्यात आले आहेत.वाहतूक नियंत्रण करताना पोलीस, परिवहन आणि महसूल विभाग एकत्रित कारवाई करतात. यामुळेही ट्रॅफिक जाम होतो. यावर तोडगा काढण्यासाठी गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे

## कशेडी घाटातील भुयारी मार्गावर तिसऱ्यांदा दरड कोसळली

### भुयारांमध्ये वीजेचा लपंडाव सुरू



**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई गोवा महामार्गावरील कशेडी घाटात खेड हद्दीत भुयारी मार्गापासून २०० मीटर अंतरावर दरड कोसळण्याची घटना तीन महिन्यांत तिर्सय़ांदा घडली आहे. याखेरीज, दोन्ही भुयारांमध्ये वीजेचा लपंडाव सुरू असल्याने अचानक काळोख अथवा प्रखर प्रकाश झाल्याने वाहनचालकांना त्रास होत आहे.

गेल्या मे व जून महिन्यात सुद्धा याच ठिकाणी दरड कोसळून वाहतुकीला अडथळा निर्माण झाला होता. आज पुन्हा कशेडी भुयारी मार्गाजवळ दरड कोसळल्याने मुंबई दिशेने जाणारी वाहतूक एकाच लेनवरून सुरू करण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली आहे. महामार्ग प्रशासन व शिंदे डेव्हलपर्स कंपनीकडून दरड हटविण्यासाठी यंत्रणा पाठवून दरड हटविण्याचे काम सुरू केले आहे.

दरड कोसळल्याची माहिती मिळताच कशेडी महामार्ग पोलीस मदत केंद्राचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत सुरू ठेवली आहे.

दरम्यान, कशेडी घाटात प्रामुख्याने रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील भुयारी मार्गाजवळ वारंवार होणाऱ्या घटना लक्षात घेऊन राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभाग आणि शिंदे डेव्हलपर्स कंपनी यांनी आपत्कालीन परिस्थितीमध्ये रात्री अपरात्री कशेडी भुयाराच्या दोन्ही बाजूने टीम सज्ज ठेवणे गरजेचे बनले आहे.

अवकाळी पाऊस सुरू झाल्यापासून दोन्ही भुयारी मार्गातील विद्युतप्रकाश व्यवस्था सुरू करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आदेश दिले. मात्र, पावसाळ्यात वेळोवेळी खंडित होर्णाय़ा विद्युत पुरवठ्यामुळे भुयारात प्रखर प्रकाशझोत आणि मिट्ट काळोखाचा सुरू होणारा खेळ वाहनचालकांसाठी अपघाताला निमंत्रण देणारा ठरण्याची शक्यता आहे.

## पाथरज आश्रम शाळेतील मुलांना मुख्याध्यापकांकडून मारहाण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्याच्या दुर्गम भागात असलेल्या पाथरज आदिवासी आश्रम शाळेतील मुलांकडून अग्निशमन सिलेंडर फुटला. या कारणावरून प्रभारी मुख्याध्यपकांनी विद्यार्थ्याला छडीने मारले. या मारहाणीत मुलाच्या हातावर वळ उठले आहेत. ही घटना समजताच आदिवासी संघटनेचे कार्यकर्ते आश्रम शाळेत येऊन घडल्या प्रकाराची माहिती घेतली.

पाथरज आदिवासी आश्रम शाळेतील बारावीच्या काही विद्यार्थ्यांनी अग्निशमन सिलेंडर बाथरूम मध्ये नेऊन फोडले. हे आश्रम शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक अजित बनसोडे यांना समजले. त्यांनी हा प्रकार कुणी केला? हे विचारण्यासाठी बारावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना विचारले. परंतु एकही विद्यार्थी नाव सांगत नव्हता म्हणून त्या रागात बनसोडे यांनी चार विद्यार्थ्यांना छडीने मारले. त्यांच्या मारण्याने मुलांच्या हातावर छडीचे वळ उठले. मात्र याबाबत विद्यार्थ्यांच्या पालकांनी कोणतीही तक्रार केली नाही.

ही घटना समजताच आदिवासी संघटनेचे कार्यकर्ते आश्रम शाळेत आले. त्यांनी मुख्याध्यापक बनसोडे यांच्याकडून घटनेची माहिती घेतली. सर्व परिस्थिती त्यांच्याही लक्षात आली. बनसोडे यांनी ' मी विद्यार्थ्यांना दोन दोन छड्या मारल्या. ही माझ्याकडून चूक झाली. कोणताही रोष ठेऊन मी मारले नाही. मुलांना शिस्त लागावी. त्यांनी गैरवर्तन करू नये म्हणून माझ्याकडून हे घडले.' असे स्पष्ट केले. तसेच विद्यार्थ्यांनीही चूक मान्य करून पुन्हा असे प्रकार करणार नाही. असे सांगितले.

**विद्यार्थ्यांना मारणे ही चूकच आहे. ही चूक प्रभारी मुख्याध्यापक अजित बनसोडे यांनी मान्य केली आहे. यापुढे असे कृत्य होणार नाही. याची दक्षता घेतली जाईल.'**

**– अनंत खैरे, गट शिक्षण अधिकारी, कर्जत**

## राष्ट्रीय मानव विकास संस्थेची सीएसआर फंड विषयी प्रशिक्षण कार्यशाळा

**उरण : रामप्रहर वृत्त**

मसूरी,उत्तराखंड येथील हॉटेल रामादा येथे राष्ट्रीय मानव विकास संस्था,नवी दिल्ली. यांच्या वतीने कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) फंड या महत्त्वाच्या विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षण शिबिर कार्यशाळा झाली.

या कार्यशाळेत संपूर्ण देशातील महत्त्वाच्या २१ उद्योगातून अधिकारी कर्मचारी सहभागी झाले होते. या कार्यशाळेत सहा सत्रात तज्ञ मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले.या मध्ये गायत्री सुब्रमण्य ,हितेंद्र मेहता, अमित गुप्ता , जी.पी.मदान इत्यादी तज्ञ मार्गदर्शक होते. सी एस आर फंडा हा समाजाच्या विकासासाठी वापरण्याचे बंधन महत्त्वाच्या मोठ्या शासकीय उद्योगांना आहे. या विषयीचे नियम, कार्यपद्धती व एकंदरीतच समाजाच्या विकासासाठी या फंडाचे योगदान याविषयी सखोल असे मार्गदर्शन झाले.

या प्रशिक्षण कार्यशाळेत जे एन पी ए कडून मा.सुरेश पाटील भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री व कामगार नेते यांनी सहभाग घेतला होता. त्यांनी जे एन पी ए ने सी एस आर फंडाच्या माध्यमातून येथील स्थानिक रायगड जिल्ह्याच्या व देशाच्या सामाजिक विकासासाठी दिलेले योगदान या कार्यशाळेत अधोरेखित केले.




## अलिबाग तालुका ग्रामपंचायत सरपंच आरक्षण

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील ६२ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी पुढील पाच वर्षांसाठीची आरक्षण सोडत आज काढण्यात आली. यासाठी नियोजन भवनच्या सभागृहात तहसीलदार विक्रम पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात ही प्रक्रिया पार पडली. ६२ पैकी ३१ ग्रामपंचायतींची सरपंच पदे महिलांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत.

मयुरा महेंद्र महाडीक या चिमुरडीच्या हस्ते चिठ्ठया काढून आरक्षण निश्चित करण्यात आले. विविध राजकीय पक्षांचे आजच्या सोडतीकडे लक्ष होते. २२ एप्रिल रोजी झालेली सोडत रद्द करून सरकारने पुन्हा नव्याने आरक्षण सोडत काढण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आपल्या ग्रामपंचायतीचे आरक्षण कुठल्या प्रवर्गासाठी आरक्षित होते, मागील आरक्षणात यावेळी काही बदल होतो का याची उत्सुकता राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना आणि इच्छुक उमेदवारांना लागून राहिली होती. त्यामुळे सर्वच पक्षांच्या कार्यकर्त्यांनी आरक्षण सोडत सभेला गर्दी केली होती. हे आरक्षण २०२५ ते २०३० या काळात होणारया ग्रामपंचायत निवडणूकांसाठी लागू असणार आहे.

तहसीलदार विक्रम पाटील यांनी आरक्षणसोडतीची प्रक्रिया सुरूवातीलाच सर्वांना समजावून सांगितली. त्यानंतर खेळीमेळीच्या वातावरणात सोडत काढण्यात आली. निवडणूक नायब तहसीलदार अजित टोळकर, महसूल नायब तहसीलदार संदीप जाधव यांनी तहसीलदारांना या कामी सहकार्य केले.



### असे आहे आरक्षण–

**अनुसूचित जमाती महिला (६)** – कावीर, चिंचोटी, पेढांबे, ढवर, मानकुळे, मानतर्फे झिराड, **अनुसूचित जमाती खुला (५)** – आवास, वैजाळी, शहापूर, नागाव, पेझारी **अनुसूचित जाती महिला** – आंबेपुर, नागरिकांचा मागास प्रवर्ग **महिला (८)** – नवेदर नवगाव, खंडाळे, शहाबाज, कुरकुंडी कोलटेंभी, खानाव, कुर्डुस, रेवदंडा, आक्षी,**नागरिकांचा मागास प्रवर्ग खुला (९)** – सातिर्जे, वाडगाव, बामणगाव, चिंचवली, मुळे, रेवस, आगरसुरे, कामार्ले, बेलोशी, **सर्वसाधारण महिला (१६)** – झिराड, चेंढरे, थळ, किहीम, मापगाव, वेश्वी, वाघोडे, शिरवली, चौल, रांजणखार– डावली, नारंगी, सासवणे, कुसुंबळे, परहुर, खिडकी, रामराज, **सर्वसाधारण खुला (१७)** – बेलकडे, कुरुळ, सहाण, धोकवडे, बोरीस, मिळकतखार, सारळ, सुडकोली, बोरघर, पोयनाड , वाघ्रण, वरंडे, ताडवागळे, कोप्रोली, श्रीगाव, चरी, वरसोली

## भाजप युवा मोर्चा कार्यकर्त्ये धावले मदतीला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मंगळवारी खारघर सेक्टर १२ मध्ये पार्क करून ठेवलेल्या एका वाहनावर अचानक झाड कोसळल्याची घटना घडली. या दुर्घटनेमुळे गाडीचे मोठे नुकसान झाले.

या घटनेची माहिती मिळताच भाजप युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पनवेल महानगरपालिकेच्या सहाय्यक अधिकाऱ्यांशी समन्वय साधून झाड कापण्याचे काम हाती घेतले. झपाट्याने कारवाई करत रस्ता मोकळा करण्यात आला.यावेळी भाजप युवा मोर्चा, खारघर शहर मंडळउपाध्यक्ष प्रविण रामजीभाई बेरा सचिव दीपक ठाकूर व सहसंयोजक, हार्दिक पटेल उपस्थित होते



## भाताण बोगद्यात पुन्हा अपघात; १४ जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई पुणे एक्सप्रेस वे वर भाताण बोगद्यात ३ वाहनांचा विचित्र अपघाात ८ प्रवासी जखमी जखमींना रुग्णालयात उपचार सुरू पुणे लेन अपघातात अचानक वाहने एकमेकाला धडकल्याने काही प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. सर्वांवर एमजीएम हॉस्पिटल पनवेल येथे उपचार सुरू आहेत.



मंगळवारी सायंकाळी ५ वा सुमारास घडली दीपक गावकर , तेजस्विनी गावकर , संगीता जाधव घाटकोपर , सुरेश जाधव , सुनिता घुले सतीश उकर्डे सतीश उकर्डे , आकाश गायकवाड , सतीश इंगवले ,किरण पोटभरे गुंडा कोळी प्रशांत, हेगडे अमजद पठाण , रमेश चौगुले, लियाकत, अशी अपघातात जखमी झालेल्यांची नावे आहेत सर्वांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे . मागील महिन्यात ही ४ घटना घडल्या

८ जुन ८ वाहने एकमेकांवर आदळली ३० जखमी बांगलादेशी कैदी घेऊन जात असताना पोलीस वाहनांना अपघात, १७ जुन बस पिक अप मधील अपघातात १ ठार, २४ जून मोटारसायकल अपघातात मोटारसायकल स्वार रोहित कदम ठार, ३० जून ३ जुलै कोंबड्यां वाहक टेम्पो अपघातात चालक ठार

पान १ वरुन

## रायगड जिल्ह्यालाही पावसाने झोडपले

कोलाड येथे उड्डाणूपलांचया कामाचा फटका रस्त्यालगतच्या छोटया व्यावसायिकांना बसला. पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी व्यवस्थाच नसल्याने दुकानांमध्ये पाणी शिरल्याने व्यावसायिकांचे नुकसान झाले.

महाडच्या रावढळ पुलावरून वाहतूक बंद करण्यात आली होती. विन्हेरे विभागातील नागेश्वर नदीचे पाणी मल्लिकार्जुन मंदिराजवळील पुलावरून वाहत होते. त्यामुळे हा मार्गदेखील वाहतूकीसाठी बंद होता. अलिबाग तालुक्यात रामराज पुलावर पाणी आले होते तसेच रामराज बाजारपेठेतदेखील पाणी घुसले होते. अलिबाग–तळा मार्गावर पाणी आल्यामुळे या मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली होती. रोहा तालुक्यातील धामणसई येथे ओढयात अडकलेल्या सहाजणांची बचाव पथकाने सुखरूप सुटका केली.

**दुपारनंतर जोर ओसरला**

*सकाळी धोधो कोसळणारया पावसामुळे सर्व यंत्रणांना सज्ज राहण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. नागरीकांनाही सतर्क राहण्यासा सांगण्यात आले. खबरदारीचा उपाय म्हणून महाड पोलादपूर, माणगाव, तळा, सुधागड, म्हसळा या सहा तालुक्यातील शाळा, महाविद्यालयांना जिल्हाधिकारी यांनी सुटी जाहीर केली. दुपारनंतर पावसाचा जोर हळूहळू कमी होत गेला, मात्र भरतीची वेळ असल्याने नद्यांची पाणी पातळी कमी होत नव्हती.*

**पावसाची आकडेवारी (मिमी)**

*अलिबाग ५६.०० , मुरुड ८५.००, पेण ९५. ००, पनवेल ६१.०४, उरण २७.००, कर्जत १९.०२, खालापूर ५८.००, माथेरान ८०.००, सुधागड १३९.००, माणगाव ११०.००, तळा ९१.००, महाड ५८.००, पोलादपूर १०५.००, श्रीवर्धन ११५.००, म्हसळा १३०.००, रोहा ११७.००, एकूण: १३४६.०६ सरासरी. ८४.१६*

## एकत्रित एसओपी लवकरच जाहीर करणार –मुख्यमंत्री

यासोबतच कॅमेऱ्यांची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी एकाच विभागावर निश्चित केली जाईल. हा विभाग गृह, पोलीस किंवा इतर कोणता असेल, याचा निर्णय अमंलबजावणीच्या गरजेनुसार घेतला जाईल. आणि त्या अनुषंगाने एकत्रित एसओपी (Standard Operating Procedure) लवकरच जाहीर करण्याचे आश्वासन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिले.

गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनीही या प्रश्नावर उत्तर देताना सांगितले कि, सुरक्षिततेच्या अनुषंगाने आमदार प्रशांत ठाकूर यांनी महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यात सीसीटीव्ही प्रकल्प राबविण्यात आले. रत्नागिरीचा प्रकल्प पोलीस विभागामार्फत परंतु रायगडचा प्रकल्प डीपीडीसी, सीएसआर अशा निधीतून पोलीस ठाण्यात लावण्यात आली तरी त्यांची कार्यान्वित यंत्रणा त्या ठिकाणी नगरपालिका होती. त्या ठिकाणी ५० ते ६० टक्के कॅमेरे बंद झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्या संदर्भात कारवाई करण्याचे काम त्या नगरपालिकेचे होते, मात्र सीएसआर फंडातून लावण्यात आलेले कॅमेरे त्या ठिकाणी सुरू आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात सीसीटीव्हीचा प्रकल्प पोलीस अधिक्षक कार्यालयातून पूर्ण करण्यात आला. कॅमेरे ज्या ठिकाणी बंद आढळले त्या ठिकाणी पोलीस अधीक्षकांनी सीसीटीव्ही कंपनींच्या प्रतिनिधींसोबत बैठका सूचना दिल्या दिल्या कंपनीला काळ्या यादीत का टाकू नये अशा नोटीस बजावल्या. या सर्व बाबी लक्षात आल्यानंतर सन्माननीय मुख्यमंत्री यांनी सूचना केली कि या नंतर सीसीटीव्ही संदर्भातील प्रकल्प असतील त्यांचे मेंटेनन्स करण्यासाठी हे प्रकल्प गृह खात्यामार्फत राबविण्यात येतील. रायगड जिल्ह्यातील सीसीटीव्ही कॅमेरा प्रणाली लवकरात लवकर सुरु करण्यासाठी संबंधित विभागांची तात्काळ बैठक घेण्यात येईल तसेच बंद पडलेले कॅमेरे संबंधित कंपनीकडून तातडीने दुरुस्त करण्यात येतील तसेच संबंधित कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येईल आणि चुकीचे काम केले असेल तर त्या कंपनीला काळ्या यादीत टाकले जाईल, असे आश्वासन नामदार पंकज भोयर यांनी सभागृहात दिले.

## लेखक आमच्या शाळेत उपक्रम उत्साहात

**नवी मुंबई :बातमीदार**

करावे येथील ज्ञानदीप प्राथमिक शाळेतील ४ थी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना कथा लेखनाचे प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात आले. यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नवी मुंबई पालिकेचे उपायुक्त तसेच गझलकार, लेखक डॉ. कैलास गायकवाड उपस्थित होते.

ज्ञानदीप प्राथमिक शाळेत विविध उपक्रम सुरु असतात त्यातील लेखक आमच्या शाळेत या उपक्रमात प्रमुख पाहुण्यानी कथाकथनाला योग्य ते वातावरण निर्माण केले.

विद्यार्थ्यांशी संवाद साधला. पाहुण्यांनी एक कथा विद्यार्थ्यांना सांगितली. या कथेचे सार असे होते




की, वडिलांनी दिलेल्या पैश्यांचा सदुपयोग करून जो मुलगा घर भरून टाकणारी गोष्ट आणेल तो वडिलांच्या संपत्तीचा भविष्यात मालक होईल.

शाळेतून लेखक तयार व्हावे या साठी आज त्यांना लेखनाचे धडे दिले.त्यानंतर शेवटी विद्याथ्याना एक कथा सांगितली 'अचानक लाईट गेली? या कथेचे तातपर्य थोडक्यात काय की आपण ज्या शहरात राहतो तिथल्या संस्कृतीचा आपल्या भाषेवरसुद्धा परिणाम होतो. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी हे मार्गदर्शन खूप मोलाचे ठरेल.

या कार्यक्रमाचे आयोजनव सूत्रसंचलन शिक्षिका संजना निकाळजे यांनी केले या कार्यक्रमाला मनाली माळी,नलिनी पाटील, सविता पाटील आदी शिक्षक उपस्थित होते.

## संपादकीय

# अभिव्यक्ती अनिर्बंध नको

अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे. परंतु आपल्या राज्यघटनेच्या कलम १९ (२) अंतर्गत भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर योग्य ते निर्बंधही आहेत. नागरिकांना संबंधित मूलभूत अधिकाराचा उपभोग घ्यायचा असेल तर आत्मसंयम आणि नियमनही आवश्यक आहे असे सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी म्हटले आहे. समाज माध्यमांवर सक्रीय असणाऱ्या प्रत्येक नागरिकाने याची नोंद घेणे आवश्यक आहे.

**अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा लोकशाहीचा अविभाज्य भाग आहे असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाने काही दिवसांपूर्वी एका सुनावणीत केले होते. त्यानंतर आता सर्वोच्च न्यायालयाने नागरिकांनाही त्यांच्या यासंदर्भातील जबाबदारीची जाणीव करून दिली आहे. मुक्त अभिव्यक्तीच्या नावाखाली समाज माध्यमांवर वाट्टेल ते पोस्ट करता येईल असा कुणाचा समज झाला असल्यास तो चुकीचाच म्हणावा लागेल. समाजमाध्यमांवरील आक्षेपार्ह आणि द्वेषमूलक मजकूर रोखण्यासाठी नागरिकांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मर्यादा पाळाव्यात आणि स्वयंनियमनाचे पालन करावे असे आवाहन सर्वोच्च न्यायालयाने केले आहे. समाज माध्यमांवरील आक्षेपार्ह मजकूर नियंत्रित करण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे तयार करताना सर्वोच्च न्यायालयाने हे आवाहन केले. नागरिकांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे मूल्य जाणून घेतले पाहिजे अशी टिप्पणी न्यायालयाने केली. कोलकाता येथील रहिवासी वजाहत खान याने समाजमाध्यमांवर पोस्ट केलेल्या आक्षेपार्ह मजकुरावर अनेक राज्यांमध्ये एफआयआर नोंदवण्यात आले. या एफआयआरचे एकत्रीकरण करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. वजाहत खान याने एक्स या समाजमाध्यमावर वादग्रस्त पोस्ट टाकल्याने त्याला ९ जूनला कोलकाता पोलिसांनी अटक केली होती. मी जुने सर्व ट्वीट हटवले आहेत व माफीही मागितली आहे असे त्याने सांगितले. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे. परंतु समाजमाध्यमांवर अलीकडे अनेकदा सभ्यतेचे उल्लंघन होताना दिसते. भारताची एकता आणि अखंडता राखणे हे नागरिकांचे मूलभूत कर्तव्य आहे याचे भानही असायलाच हवे. त्यासाठी समाज माध्यमांवर फुटिरतावादी प्रवृत्तींना आळा घालायला हवा. नागरिकांमध्ये बंधुभाव असेल तर द्वेषभावना कमी होईल. बंधुत्व तसेच व्यक्तीच्या प्रतिष्ठेच्या हितासाठी आपल्याला या याचिकेच्या पलीकडे पहावे लागेल असे निरीक्षणही खंडपीठाने नोंदवले. भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या गैरवापरामुळे उद्भवणारे खटले कायदेशीर व्यवस्थेला अडथळा आणत आहेत असेही खंडपीठाने यावेळी म्हटले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांचे कथित आक्षेपार्ह व्यंगचित्र समाज माध्यमांवर प्रसिद्ध केल्याचा आरोप असलेले व्यंगचित्रकार हेमंत मालवीय यांच्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने हा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गैरवापर असल्याचे स्पष्ट मत नोंदवले. संबंधित व्यंगचित्र हे अप्रतिष्ठित, आक्षेपार्ह आणि दर्जाहीन असल्याचे मत खंडपीठाने व्यक्त केले. मालवीय यांनी हा मजकूर हटवण्याची व माफी मागण्याची तयारी दर्शवली. कविता, नाटक, चित्रपट, व्यंग आणि कला यांसारखे साहित्य मानवी जीवन अधिक अर्थपूर्ण बनवते हे खरेच आहे. परंतु अशा साहित्यामार्फत विरोधी विचार प्रकट करताना वा टीका करतानाही किमान दर्जा राखणे व स्वत:च्या जबाबदारीचे भान बाळगणे आवश्यकच असते. स्वातंत्र्य आणि स्वैराचार यात जमीन-आस्मानाचा फरक आहे हे समजून घेतले पाहिजे. जाणिवा मुक्त असल्या तरी त्या स्वैर असता कामा नयेत. कुणीही उठावे आणि समाज माध्यमांवर काहीही बरळावे असे कसे चालू शकेल?**

# संविधानाच्या अवमानाचा इतिहास

न्यायपालिकेचे महत्त्व अधोरेखित करताना महाराष्ट्र विधिमंडळात केलेल्या भाषणात सरन्यायाधीश भूषण गवई यांनी न्यायपालिकेच्या अधिकारांचे संरक्षण सुदृढ लोकशाहीसाठी आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे. न्यायपालिका कुठल्याही दबावाला बळी पडणार नाही, असा गर्भित संदेशही त्यांनी यातून दिल्याचे स्पष्ट होते मात्र न्यायिक स्वातंत्र्य आणि न्यायाधीशांच्या प्रतिष्ठेवर खरा हल्ला श्रीमती इंदिरा गांधी यांच्या कारकीर्दीत सुरू झाला. मूलभूत अधिकार विषयक केशवानंद भारती खटला हरल्यानंतर श्रीमती गांधींनी सर्वोच्च न्यायालयाला केवळ गुडघे टेकवण्यास भाग पाडण्याचाच निर्णय घेतला नाही, तर आपल्याशी मतभेद असलेल्या न्यायाधीशांना धडा शिकवण्याचेही पाऊल उचलले. केशवानंद भारती प्रकरणाचा २४ एप्रिल १९७३ रोजी निकाल देण्यात आला. तेव्हाचे सरन्यायाधीश एस.एम. सिकरी दुसऱ्याच दिवशी निवृत्त होणार होते. सिकरी यांच्यानंतरचे तीन सर्वात वरिष्ठ न्यायाधीश म्हणजे जे.एम. शेलाट, के.एस.हेगडे आणि ए.एन.ग्रोव्हर. निकाल जाहीर झाल्यानंतर लगेचच मंत्रिमंडळाच्या राजकीय व्यवहार समितीची २४ एप्रिल रोजी बैठक झाली आणि या तीन सर्वात वरिष्ठ न्यायाधीशांना मागे टाकून अजित नाथ (ए.एन.) रे यांची सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला. 'आकाशवाणी'ने २४ एप्रिल रोजी संध्याकाळी ५ वाजता ए.एन. रे यांची सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती जाहीर केली. सिकरी आणि शेलाट, हेगडे आणि ग्रोव्हर यांनी निषेधार्थ राजीनामा दिला. अशा प्रकारे तत्कालीन सरकारबरोबर जुळवून न घेतल्याबद्दल या तीन न्यायाधीशांना अशी शिक्षा झाली.

त्या आधीपासूनच रजनी पटेल, मोहन कुमारमंगलम आणि इतर अनेक काँग्रेस नेते सरकारशी समर्पित न्यायाधीश सर्वोच्च न्यायालयात नेमण्याबद्दल जाहीरपणे बोलत होते. मोहन कुमारमंगलम, सिद्धार्थ शंकर रे, हरिभाऊ (एच.आर. गोखले) आणि काँग्रेसमधील इतर अनेक जण तसे उघडपणे म्हणतही असत. पक्षात आणि इंदिराजींच्या सल्लागारांमध्ये बऱ्याच काळापासून न्याय व्यवस्थेच्या अधिग्रहणाची चर्चा चालू होती. न्यायव्यवस्था म्हणजे सरकारच्या मार्गातील अडथळा, अशी भावना निर्माण केली जात होती.

या बाबत काही वर्षांनंतर गोखले यांनी सांगितले की पंतप्रधान इंदिराजी, सिद्धार्थ रे आणि कुमारमंगलम हे या भूमिकेवर ठाम होते आणि हेगडे सरन्यायाधीश होतील अशी काळजी त्यांना वाटत होती कारण हेगडे यांचा केशवानंद भारती खटल्याचा निर्णय पंतप्रधानांच्या हिताच्या विरुद्ध होता. इंदिराजींचे वैयक्तिक सचिव एन.के. धर यांच्या मते इंदिरा गांधी हेगडे यांना काढून टाकण्यास उत्सुक होत्या. गोखले, एस.एस. रे आणि कुमारमंगलम यांनी न्यायमूर्ती ए.एन. रे यांची शिफारस केली कारण त्यांची वाटचाल पाहता ते 'लवचिक' तसेच 'उदारमतवादी' असणे अपेक्षित होते. मोहन आणि गोखले यांनी इंदिरा गांधी यांना सांगितले की रे सर्वोत्तम आहेत, अशी आठवण शीला दीक्षित यांनी सांगितली.

प्रकरण इथेच संपले नाही. न्यायमूर्ती एच.आर. खन्ना यांनी सरन्यायाधीशपदाची शपथ घेतली तेव्हा ही प्रक्रिया पुन्हा सुरू झाली. काँग्रेस आणि श्रीमती गांधी हे विसरू शकले नाहीत की केशवानंद भारती प्रकरणात खन्ना यांनी संविधानाच्या मूलभूत तत्त्वांच्या संरक्षणाची बाजू घेतली होती आणि घटना दुरूस्ती करून ती बदलता येणार नाहीत असे स्पष्ट केले होते. त्यास आधार होता गोलकनाथ प्रकरणाचा.

न्यायमूर्ती खन्ना यांनी जबलपूर एडीएम खटल्यात म्हणजेच हेबियस कॉर्पस खटल्यात बहुमताबरोबर असहमती दर्शवणारा निकाल दिला की कोणत्याही परिस्थितीत मूलभूत हक्क आणि नागरिकांचे जीवन जगण्याचा अधिकार निलंबित करून कार्यकारी मंडळाला जीवन आणि स्वातंत्र्य हिरावून घेण्याचे अमर्याद अधिकार दिले जाऊ शकत नाहीत; तसे झाल्यास संविधानाच्या मूलभूत तत्त्वांचे उल्लंघन होते. न्यायमूर्ती खन्ना यांनी निकालात लिहिले की प्रतिबंधात्मक अटकेचा (स्थानबद्धतेचा) कायदा, खटल्याशिवाय अटकेचा कायदा म्हणजे वैयक्तिक स्वातंत्र्यावर प्रेम करणाऱ्या सर्वांसाठी एक शाप आहे. मूलभूत हक्कांवर निर्बंध असतानाही राज्याला (सरकारला) एखाद्या व्यक्तीचे जीवन किंवा वैयक्तिक स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा अधिकार नाही. याला संदर्भ असा आहे की अंतर्गत आणीबाणीच्या काळात (१९७५-१९७७), मूलभूत अधिकार निलंबित करण्यात आले होते. एखादा नागरिक आपल्या बेकायदा अटकेला किंवा स्थानबदधतेला न्यायालयात आव्हान देऊ शकतो का, असा प्रश्न निर्माण झाला. त्यास कारण होते अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी (एडीएम), जबलपूर प्रकरण. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने बहुमताने असा निर्णय दिला की आणीबाणीच्या काळात जीवन (जगण्याचा) आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार (कलम २१) निलंबित करण्यात आलेला आहे. म्हणजेच कोणीही व्यक्ती मनमानी अटकेविरुद्ध न्यायालयीन दिलासा मागू शकत नाही.

पाच न्यायाधीशांच्या पीठाने हा बहुमताचा (चार विरुद्ध एक) निकाल दिला. न्यायमूर्ती हंस राज (एच.आर.) खन्ना यांनी मात्र या विरुद्ध भूमिका घेतली. त्यांचे म्हणणे असे होते की जीवन आणि स्वातंत्र्य यांचा अधिकार मूलभूत असून तो आणीबाणीच्या काळातही निलंबित करता येत नाही. सेन्सॉर अधिकाऱ्यांनी वृत्तपत्रांना न्यायमूर्ती खन्ना यांच्या असहमतीच्या निर्णयाचे वृत्त प्रसिद्ध करण्याची परवानगी दिली नाही. न्यायाधीश सर्वश्री ए.एन. रे, एम.एच. बेग, यशवंत विष्णु चंद्रचूड आणि एच.एन. भगवती यांनी सरकारला, म्हणजे श्रीमती गांधीं यांना जे हवे होते तसाच निकाल दिला. त्याचा परिणाम असा झाला की आणीबाणीत स्थानबद्ध झालेले कैदी कोणत्याही सुनावणीविना तुरुंगात राहिले. हा खटला 'हेबीयस कॉर्प्स केस' म्हणून पथदर्शी ठरला आहे.

आणीबाणीतील कैदी खटल्याशिवाय आणि जगण्याचा कोणताही अधिकार नसताना तुरुंगात राहिले.

सरन्यायाधीश एस.एम. सिक्री यांनी हा ऐतिहासिक निकाल दिल्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे २५ एप्रिल रोजी राजीनामा दिला आणि ते निवृत्त झाले आणि न्यायमूर्ती जे.एम. शेलाट, के.एस. हेगडे आणि ए.एन. ग्रोव्हर यांनी सरन्यायाधीशपदासाठी ए.एन. रे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राजीनामा दिला. न्यायमूर्ती ए.के. मुखर्जी यांचे निधन झाले आणि न्यायमूर्ती पी. जगनमोहन रेड्डी वयोमानानुसार योग्य वेळी निवृत्त झाले. दुरूस्ती करून संविधानाचा आत्मा गमावता येणार नाही असा निर्णय देणाऱ्या सात न्यायाधीशांपैकी शेवटचे कायम न्यायाधीश एच.आर. खन्ना होते. सर्वात वरिष्ठ न्यायाधीश खन्ना यांना काँग्रेस सरकारने २८ जानेवारी १९७७ रोजी सरन्यायाधीशपद नाकारून एम. एच.बेग यांना नियुक्ती दिली तेव्हा त्यांनी राजीनामा दिला. केशवानंद भारती प्रकरणात अल्पसंख्याक निकाल देणाऱ्या सहा न्यायाधीशांपैकी रे आधीच सरन्यायाधीश झाले होते

घटनादुरुस्तीच्या छाननीतून न्यायव्यवस्थेला वगळणे हाच या नाट्याचा शेवट नव्हता. स्वतंत्र बाण्याच्या न्यायाधीशांना त्रास देण्यात आला तर सक्षम न्यायाधीशांना पद्म पुरस्कार, विविध आयोगांमध्ये नामांकन आणि राज्यसभेत सदस्यत्व असे पुरस्कार देण्यात आले. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या सरकारने न्यायाधीशांची एका उच्च न्यायालयातून दुसऱ्या उच्च न्यायालयात आणि तीही देशाच्या एका कोपऱ्यातून दुसऱ्या कोपऱ्यात अश्या बदल्या केल्या. आणीबाणीच्या काळात राष्ट्रीय एकात्मता साध्य करण्याच्या बहाण्याने उच्च न्यायालयांच्या १६ न्यायाधीशांची एकाच वेळी बदली करण्यात आली.

आणीबाणीच्या काळात विविध उच्च न्यायालयांमधील कित्येक अतिरिक्त न्यायाधीशांना नियमित मुदतवाढ किंवा कायम नियुक्ती नाकारण्यात आली. हे न्यायाधीश बहुतेक असे होते ज्यांनी आणीबाणीच्या काळात सामान्य नागरिकांच्या बेकायदेशीर अटकेविरुद्ध निर्णय दिला होता. यामध्ये दिल्ली उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश आर. एन. अग्रवाल यांचा समावेश होता. त्यांनी पत्रकार कुलदीप नायर यांची प्रतिबंधात्मक नजरकैदेतून सुटका करण्याचे आदेश दिले होते.

काँग्रेस पुन्हा १९८० मध्ये सत्तेत आली तेव्हा पाच उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना निवृत्त करण्यात आले. काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी आणि सरकारने न्यायाधीशांना बदनाम करण्यासाठी आणि त्यांचे मनोबल कमी करण्यात कोणतीही कसर सोडली नाही. केवळ सर्वोच्च न्यायव्यवस्थेला चिरडून समाधानी झाले नाहीत तर संविधानात अनेक दुरुस्त्या समाविष्ट करून संविधानाचा त्यांनी अवमान केला.

सरन्यायाधीश भूषण गवई यांची भाषणे ऐकताना या इतिहासाची आठवण येते आणि अघोषित आणीबाणी आल्याची टीका करणार्यांनी तो लक्षात घेऊन संयमित शब्दांत आपल्या भावना व्यक्त कराव्यात असे वाटते.

**-दिलीप चावरे, ज्येष्ठ पत्रकार**

## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सअॅप मेसेजसंदर्भात 'ही' सेटिंग बदलून राहा सेफ




गुगलने अँड्रॉइड फोनवर त्यांच्या जेमिनी एआयच्या काम करण्याच्या पद्धतीत काही मोठे बदल जाहीर केले आहेत. एका ईमेलद्वारे युजर्सना सांगण्यात आलं की, आता जेमिनी एआय व्हॉट्सअॅपसारख्या थर्ड-पार्टी अॅप्समधील डेटा एक्सेस करू शकते, जेणेकरून तुम्ही व्हॉइस कमांडद्वारे त्या अॅप्सच्या सुविधा वापरू शकता. हे एक उपयोगी फीचर वाटतं, परंतु खरी चिंता अशी आहे की, गुगलने हुशारीने ई-मेलमध्ये हे तथ्य लपवले आहे की, तुम्ही जेमिनी अॅप्स अॅक्टिव्हिटी बंद केली असली तरीही ही डेटा शेअरिंग सुरू राहील.


गुगलच्या वेबसाइटनुसार जेमिनी अॅप्स अॅक्टिव्हिटी चालू असो वा बंद, तुमचे चॅट्स तुमच्या खात्यात ७२ तासांपर्यंत सेव्ह केले जाऊ शकतात. याचा स्पष्ट अर्थ असा आहे की व्हॉट्सअॅपवरील तुमचे खासगी संभाषणदेखील तात्पुरतं जेमिनीजवळ स्टोर केलं जाऊ शकतं. गुगलचा दावा आहे की असं केल्याने, जेमिनी तुमच्यासाठी उत्तरं तयार करू शकेल आणि ती पाठवू शकेल, मात्र यामुळे युजर्सच्या सुरक्षिततेबद्दल गंभीर प्रश्न निर्माण होतात.

मेटाने नेहमीच म्हटलं आहे की, व्हॉट्सअॅप चॅट्स एंड-टू-एंड एन्क्रिप्टेड असतात आणि इतर कोणीही वाचू शकत नाहीत, अगदी मेटाला नाही, परंतु ही सुरक्षा फक्त अॅपमध्ये मर्यादित आहे. तुमच्या फोनवर येणारे नोटिफिकेशन अलर्ट ज्यामध्ये मेसेजचा मजकूर असतो ते वाचता येतं. काही अँड्रॉइड फोन व्हॉट्सअॅप न उघडता २४ तासांसाठी या नोटिफिकेशन्स सेव्ह करतात.

गुगलने अद्याप स्पष्ट केलेलं नाही की जेमिनी या चॅट्स कसे वाचतील किंवा स्टोअर करतील, परंतु नोटिफिकेशन्स एक्सेस करण्याचा सर्वात सोपा आणि संभाव्य मार्ग अॅपद्वारे असू शकतो. अँड्रॉइड सिस्टममध्ये जेमिनीच्या खोल प्रवेशामुळे, ते केवळ नोटिफिकेशन्सपुरते मर्यादित राहणार नाही व यामुळे युजर्सच्या मेसेजिंग अनुभवाच्या सुरक्षिततेबद्दल चिंता निर्माण होते. म्हणून अँड्रॉइड फोनवर जेमिनी अॅप उघडा. वर उजवीकडे असलेल्या प्रोफाइल आयकॉनवर टॅप करा. जेमिनी अॅप्स अॅक्टिव्हिटी पर्यायावर क्लिक करा. आता उघडणाऱ्या स्क्रीनमध्ये तुम्हाला एक टॉगल स्विच दिसेल, तो बंद करा. यानंतर जेमिनी तुमच्या कोणत्याही अॅप्समधील डेटा अॅक्सेस करू शकणार नाही. लक्षात ठेवा, कोणताही डेटा आधीच जेमिनीकडे असेल तर तो त्याच्या सर्व्हरवर ७२ तासांसाठी सेव्ह केला जाऊ शकतो.

# मराठी साहित्यिक वा. कृ. चोरघडे

## निमित्त



प्रसिद्ध मराठी कथाकार वामन कृष्ण चोरघरे उर्फ वा.कृ. चोरघडे यांचा जन्म नागपूर जिल्ह्यातील नारखेड या गावी १६ जुलै १९१४ रोजी झाला. त्यांचे शिक्षण नागपूर येथेच झाले असून मराठी व अर्थशास्त्र हे दोन विषय घेऊन एम.ए. आणि बी.टी. या पदव्या मिळविल्यावर त्यांनी १९४९पर्यंत वर्धा येथील महाविद्यालयात अध्यापन केले. त्यानंतर काही काळ नागपूर येथील 'जी. एस. कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स' येथे उपप्राचार्य म्हणून काम केले. त्यानंतर 'महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळा'चे संचालक. नागपूर विद्यापीठात १९४६ ते ७०पर्यंत विद्यासभा, कार्यकारिणी आदी वीस समित्यांवर त्यांनी काम केले आहे. गांधीवादाचा त्यांच्या विचारावर प्रभाव असून १९४२ च्या आंदोलनात त्यांनी तुरुंगवासही भोगला.

१९३२मध्ये 'अम्मा' ही त्यांची पहिली कथा प्रसिद्ध झाली. त्यानंतर पारिजात, प्रतिभा, सत्यकथा, ज्योत्स्ना, कला इ. विविध वृत्तींच्या वाङ्मयीन नियतकालिकांतून त्यांनी प्रामुख्याने कथालेखन केले. सुषमा (१९३६) हा त्यांचा पहिला कथासंग्रह. त्यानंतर हवन (१९३८), यौवन (१९४१), प्रस्थान (१९४५), पाथेय (१९४६), संस्कार (१९५०), प्रदीप (१९५४), ओंजळ (१९५७), मजल (१९६३), बेला (१९६४), ख्याल (१९७३) इ. त्यांचे अन्य कथासंग्रह प्रसिद्ध झाले.

चोरघडे स्वतःस जीवनाचे उपासक समजतात, तथापि 'कलेसाठी कला' या भूमिकेचा त्यांनी पुरस्कार केला आहे. आत्मप्रकटीकरणासाठी कथा हेच माध्यम त्यांना आवडते. चोरघडे हे फडके-खांडेकर युगातील कथा आणि नवकथा यांतील एक मोलाचा आणि महत्त्वाचा दुवा होत.

काव्यात्म वृत्तीने लिहिलेली चोरघडे यांची कथा फडके-खांडेकर युगातील कथेला सांकेतिकतेच्या बंधनातून मुक्त करू शकली. जे भोगले तेच त्यांच्या कथेतून अवतरले. त्यांची कथा म्हणजे भावस्थितीचे क्षणचित्र होय. 'विहीर', 'घार', 'काचेची किमया', 'अतिथी देवो भव', 'संस्कार' इ. कथांतून स्वतःचे असे वेगळे विश्व त्यांनी उभे केले सामर्थ्य आहे. नव्या शैलीच्या त्यांच्या कथांत वाचकाला अंतर्मुख करण्याचे सामर्थ्य आहे.

काळ बदलला आहे हा वा.कृ. चोरघडे यांच्या संकीर्ण लेखांचा संग्रह असून काका कालेलकर, साने गुरुजी, नरकेसरी अभ्यंकर यांची चरित्रेही त्यांनी लिहिली आहेत. माधव सावंत यांच्या सहकार्याने त्यांनी एक मराठी-हिंदुस्तानी कोश संपादित केला आहे. त्यांच्या आजवरच्या स्वतंत्र, अनुवादित-संपादित ग्रंथांची संख्या ७४ इतकी आहे.

वा.कृ. चोरघडे यांच्या प्रदीप आणि पाथेय या कथासंग्रहांना मध्य प्रदेश शासन साहित्यपरिषदेचे पारितोषिक मिळाले चोरघडे यांची कथा या संग्रहास महाराष्ट्र शासनाचे पारितोषिक मिळाले संपूर्ण चोरघडे या संग्रहास प्रवासी वंग साहित्य संमेलनात 'युगांतर' पारितोषिक मिळाले. याच ग्रंथास नागपूर विद्यापीठानेही सुवर्णपदक देऊन गौरविले.

**(साभार : इंटरनेट)**


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# घसा सारखा खवखवतो? हे उपाय करा...

घसा खराब होणे, सोलवटल्यासारखे वाटणे आणि खाताना त्रास होणे हे अनेकदा बदलत्या हवामानामुळे, गरम-थंड पदार्थ एकत्र खाल्ल्यामुळे किंवा संसर्गामुळे होते. अशा वेळी घसा जळजळतो, खवखवतो आणि बोलताना किंवा खाता-पिताना प्रचंड वेदना होतात. सुरुवातीला ही समस्या सामान्य वाटते, पण दुर्लक्ष केल्यास ती वाढू शकते आणि औषधांची गरज लागू शकते. त्यामुळे सुरुवातीपासूनच योग्य घरगुती उपाय करायचे. त्यामुळे त्रास कमी होतो आणि आराम मिळतो तसेच पुढे दवाखान्याच्या फेऱ्या माराव्या लागत नाहीत.



घसा दुखत असेल, सोलवटलेला वाटत असेल तर सर्वात आधी गरम पाण्याच्या गुळण्या करणे हा उपाय आपण सारेच करतो. एका ग्लास कोमट पाण्यात अर्धा चमचा मीठ टाकून दिवसातून दोन ते तीन वेळा गुळण्या केल्याने घशाची सूज कमी होते. तेथील जंतू नष्ट होतात. हळद आणि दूध हे त्रासावर रामबाण औषध मानले जाते. रात्री झोपण्यापूर्वी गरम दुधात अर्धा चमचा हळद टाकून ते दूध प्यायचे. हळदीतील अँण्टीसेप्टिक गुणधर्म घशातली जळजळ शांत करतात आणि झोपही लागते.

तुळस आणि आल्याचा काढा तयार करून प्यायल्यास घशाला खूप आराम मिळतो. या काढ्यासाठी पाण्यात तुळशीची पाने, आल्याचा तुकडा, थोडी काळीमिरी आणि गवती चहा घालून उकळायचे. हा काढा दिवसातून एक किंवा दोन वेळा घेतल्यास घशाची सूज कमी होते. आल्याचा रस आणि मध यांचं मिश्रण घेतल्यासही घसा मोकळा होतो. एक चमचा मधात थोडा आल्याचा रस घालून ते थोडं थोडं करून चाटा. त्यामुळे घशाचा कोरडेपणा राहत नाही आणि सततचा त्रास कमी होतो.

वाफ घेणे हाही एक उत्तम उपाय आहे. गरम पाण्यात थोडं मिंट ऑईल किंवा ओवा टाकून घेतलेली वाफ घशातील बंद जागा मोकळ्या करते. वाफ घेतल्याने सर्दी, खवखव दूर होण्यास मदत होते. खूप थंड पदार्थ, बर्फाचे पाणी किंवा आइसक्रीम टाळणे महत्वाचे आहे. तसेच उष्ण गरमागरम आहार घ्यावा. गरम सूप, मूगडाळीचे वरण, खिचडी असे पदार्थ खायचे. घशाला आराम मिळतो आणि पचनासाठीही ते सोपे असतात.

घसा दुखणं सामान्य असलं तरी काही वेळा ही लक्षणे तीन-चार दिवसांपेक्षा जास्त काळ टिकत असल्यास किंवा ताप, अन्न-पाणी घेता न येणं, सततचा त्रास जाणवायला लागल्यावर तत्काळ डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे असते.

# खालापूर आयटीआय जागेचा प्रश्न जटील

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरातील मौजे चिंचवली येथील खालापूर शासकीय आ.य.टी.आय.ची जागा गेल्याअनेक वर्षांपासून भाडे तत्वावर आहे.भाडे करार संपला असून जागा मालकाने हि जागा खाली करुन मागितल्याने जागेचा प्रश्न जटील बनत चालल्याने विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला लागला आहे.

शासनाने ३० वर्षीपूर्वी नव्याने उभे राहणारे उद्योगधंदे याचा विचार करून तालुका पातळीवर कुशळ मनुष्यबळ उपलब्ध व्हावे या करिता खालापूर येथे सुरवातीला पंचायत समितीच्या गोदामा मध्ये शासकीय आ.य.टी.आय सुरू केले. त्यानंतर काही वर्षापूर्वी या इमारतीची दुरावस्था झाल्याने शहरातील काही राजकीय पक्ष व सामाजिक कार्यकर्त्यांनी सहयांची मोहिम हाती घेतअंदोलन छेडून शासनाने खोपोली शहरात आयटीआयची इमारत उभारावी अशी मागणी केली होती.

शहरातील चिंचवली शेकिन येथील जागेची पहाणी करुन हि जागा निश्चित करून भाडे तत्वावर या ठिकाणी आय.टी. आय सुरू केल्याने आज २५० गोरगरीब, गरजू व आदीवासी तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रशिक्षण घेणे सोयीचे झाले .

चिंचवली येथील जागेचा करार मागेच संपुष्टात आल्याने जागा मालकाने हि जागा खाली करुन मागीतली आहे. त्यामुळे २५० विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात आहे.

**सरकार कडून भाडे वेळेवर मिळत नाही तरी केवळ ग्रामीण भागासह स्थानिक विद्यार्थ्यांना तांत्रिक प्रशिक्षण मिळावे म्हणून करार करताना घरपट्टीमध्ये ५० टक्के सुट देण्याचे लेखी ठरले होत. परंतु खोपोली नगरपरिषदेने वाणिज्य स्वरुपात भरमसाट घरपट्टी दांडासह आकारली आहे. यामुळे नाईजाने मुदत संपल्यावर करार संपुष्टात आणणार आहे.**

**-तेजस्वी देशमुख,**
**इमारत मालक,**



## न्यायालयात विशेष मध्यस्थी मोहिमेचे आयोजन

**रायगड :** मध्यस्थी म्हणजेच संवादाच्या आणि समन्वयाच्या माध्यमातून वाद मिटविण्याची एक शांततामय व कायदेशीर पध्दत आहे. 'राष्ट्रासाठी मध्यस्थी याचा अर्थ असा होतो की, मध्यस्थी ही प्रकिया राष्ट्रहितासाठी वापरली जात आहे. केवळ वैयक्तिक किंवा संस्थात्मक पातळीवर नव्हे, तर संपूर्ण देशाच्या हितासाठी ही मोहिम राबविली जात आहे. विशेष मध्यस्थी मोहिम जिल्हा न्यायालय रायगड तसेच तालुका न्यायालय येथे १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येत आहे.

### त्रिवेणी संगम सिहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.

नोंदणी क्र. एनबीओएम / सिडको / एचएसजी / (ओएच) / ३९६/ जेटीआर–सन १९९५–९६ भूखंड कं. १२, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प.), नवी मुंबई, ४१० २०६.

**त्रिवेणी संगम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, भूखड क्र.१२, सेक्टर–८, खांदा कॉलनी** या संस्थेच्या इमारत पुर्नबांधणी कामाकरिता नामांकित तज्ञ आर्किटेक्ट, प्रकल्प व्यवस्थापन सल्लगाराची PMC करिता सिलबंद निविदा मागवित आहोत इच्छुक व्यावसायिकांनी सदर निविदा वरिल दिलेल्या पत्त्यावर दिनांक **१६/०७/२०२५ वे दि.२३/०७/२०२५** पर्यत भ्रमणध्वनी ७५८८६८३९११ यावर संपर्क साधून सादर कराव्यात.

**सही/–** **मा. चेअरमन** | **सही/–** **मा. सचिव**
**त्रिवेणी संगम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित.**

### महाराष्ट्र शासन

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड अलिबाग यांचे कार्यालय काँग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षीकर्वे, अलिबाग जि. रायगड
दूरध्वनी क्रमांक ०२१४१–२२२०१३ ई–मेल ddr_rgd@rediffmail.com
जा.क्र जिउनि/गृह/मोफ /नियो./जाहीर नोटीस/१८२७ सन २०२५ दिनांक :– १५/०७/२०२५

**महाराष्ट्र मालको हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम १० (१) अन्वये प्राप्त अर्जावरील नोटीस**

अर्जदार नियोजित स्काय फॉरेस्ट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., विचुंबे पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड यांनी मे साई चिराग इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि. कार्यालय–१७७/३, एल्डोरा कॉम्प्लेक्स, रिस खालापूर, ता. खालापूर, जि. रायगड ४१०२२२ यांचेविरुध्द महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम १० (१) अन्वये संस्था नोंदणीचे निर्देश मिळणेकरीता अर्ज केला आहे.

अर्जदाराचे अर्जाबाबत सर्व सबंधीताना आपले म्हणणे सादर करणेसाठी संधी मिळावी म्हणून या कार्यालयाने सुनावणी घेतली आहे. त्यामध्ये सदर अर्जाबाबत गैरअर्जदार यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जवाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत असून त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक ३१/०७/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे, यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण : अलिबाग**
**दिनांक १५.०७.२०२५**

**सही/–**
**प्र.का. जगताप**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

## तळा तालुक्यात संततधार

**तळा :** तळा तालुक्यात रात्री पासून संततधार मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळित होऊन. तालुक्यातील तळेगावकडे जाणाऱ्या रस्त्यावरील संगमाच्या पुलावर पाणी आल्याने वाहतूककोंडी होऊन सकाळी संपर्क तुटला होता.तसेच रोहाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पढवण येथील पुलावर पाणी आल्याने हा मार्गही बंद झाला होता.या पुलावरील पाण्याचा एवढा वेग होता की पुलाचे संरक्षक कठडे वाहून गेले आहेत.

रात्रीपासून सकाळपर्यंत जोराचा मुसळधार पाउस पडत होता. त्यामुळे मागील घडलेल्या घटनांची आठवण नागरिकांना झाली. ग्रामीण भागातील अनेक नदी नाल्यांना पाणी आले होते.

### परिशिष्ट क्र. १६

**(उपविधी क्र. ३५ अन्वये)**
**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना**
**नोटीस**

**सरकारी नोकर** सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता **न.पनवेल** या संस्थेचे सदस्य असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत / भूखंडावर / गाळा/ बंगला क्र. ...... धारण करणाऱ्या **श्री. कृष्णा लक्ष्मण कोलगे** यांचे **तारीख ०३/०२/२०१०.** रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात /मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मार्गणीदार/हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून.**१५ दिवसात** त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत, कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या/हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस / हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे **/दुपारी १२:००. वा** ते/**दुपारी ४.०० वा.. पर्यंत**, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित
यांच्या करिता आणि वतीने

**ठिकाण : न. पनवेल**
**दिनांक : १५/०७/२०२५**

**सही/–**
**सचिव**
**सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संख्या मर्यादित**

### सिडको शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना
## (अंतिम नैना नगर रचना परियोजना क्र. ७)

**(देवद (भाग), विचुंबे, (भाग), उसर्लीखुर्द (भाग), शिवकर (भाग),कोळखे (भाग)**
**(महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम १९७४ च्या नियम क्रमांक १३(९) अन्वये)**

शासनाच्या नगर विकास विभागाने निम्न स्वाक्षरीकार यांची अधिसूचना क्र. टीपीएस–१२२२/२१५२/प्र.क्र.१४८/२२/नवि–१२, दिनांक २ डिसेंबर २०२२ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ७२(१) अन्वये लवाद म्हणून मंजूर प्रारुप नैना नगर रचना परियोजना क्र. ६ साठी नियुक्ती केलेली आहे.

त्याप्रमाणे निम्नस्वाक्षरीकार यांनी अंतिम नैना नगर रचना परियोजना क्र. ७ चा निवाडा उक्त अधिनियमांच्या कलम ७२(७) अन्वये तसेच उक्त नियमांच्या नियम क्र. १३(९) प्रमाणे दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी विहीत मुदतीत जाहीर केलेला आहे.

याबाबतची सूचना दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग–२ व ०१.१०.२०२४ रोजीच्या वृत्तपत्र दैनिक न्यूजबॅण्ड मध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच योजनेचा अहवाल, फॉर्म, क्र. १ व २, व योजनेचे नकाशे हे सिडकोच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत. प्रसिध्द करण्यात आलेली अंतिम नगर रचना परियोजना प्रामुख्याने भूखंडांचे मूल्य, अंशदान, खर्चाचा अंदाज इत्यादी स्वरुपाची आहे. त्यानुसार प्रत्येक जमीन मालकाला विहीत नमुना क्रमांक ५ मध्ये त्याच्या अंतिम भूखंडाचे मूल्य तसेच अंशदान इत्यादींचा तपशील उक्त् नियमांच्या नियम क्र.१३(९) प्रमाणे पोस्टामार्फत पाठविण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम च्या कलम ७३ अन्वये कलम ७२, पोट कलम ६ चे खंड १,२,४, ५ आणि खंड ७ ते १३ या मधून उदभवणाऱ्या बाबींखेरीज इतर बाबतीत लवादांचा प्रत्येक निर्णय हा अंतिम व निर्णायक राहील आणि नियोजन प्राधिकरणासह सर्व पक्षांना तो बंधनकारक राहील अशी तरतुद आहे. तसेच कलम ७४ अन्वये कलम ७२ चे पोट कलम ६ खंड चे १,२,४, ५ आणि खंड ७ ते १३ अन्वये लवादाने दिलेले कोणतेही निर्णय नियोजन प्राधिकरणासह संबधीत पक्षांना कळविण्यात येतील आणि अश्या निर्णयामुळे स्वत:वर अन्याय झाला आहे असे वाटणाऱ्या कोणत्याही पक्षास अपिल न्यायाधिकरणाकडे ही बाब अपीलावरील निर्णयाकरीता पाठविण्यासाठी लवादाकडे अर्ज करता येईल अशी तरतूद आहे.

**असे आढळून आले आहे की, काही अंतिम भूखंडांच्या जमीन मालकांना अदयाप अशा नोटीसा मिळालेल्या नाहीत, या संदर्भात निम्न स्वाक्षरीकार ही जाहीर नोटीस देत आहेत की, अंतिम भूखंडांच्या ज्या जमीन मालकांना अशा नमुना क्र.५ मधील नोटीसा मिळालेल्या नाहीत त्या त्यांनी लवादांच्या कार्यालयात तात्काळ येवून घेवून जाव्यात.**

**या नुसार जमीन मालकांना असेही कळविण्यात येत आहे की, वर नमूद अधिनियमाचे तरतुद नुसार जर अंतिम भूखंडाचे जमिन मूल्य, अंशदान बाबत त्यांना अपील करावयाचे असेल तर ही जाहीर नोटीस वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून २ महिन्यांच्या कालावधीत निम्न स्वाक्षरीकार यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी दाखल करावे.**

(अभिराज गिरकर)
लवाद
रचना परियोजना क्र.७ (नैना)

**दिनांक – जुलै २०२५**
**पत्ता– नैना कार्यालय , टॉवर नं. १०,**
**आठवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन,**
**सिबीडी– बेलापूर– नवी मुंबई–४०० ६१४**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१६४/२०२५–२६

### जाहिर नोटीस

सदर जाहिर नोटीशी द्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की,
आमचे अशिल श्री. हरिश्चंद्र हिरामण मढवी रा. वावंजे,ता.पनवेल, जि. रायगड यांचे सामाईक मालकी हिश्यातील खालील नमुद शेत जमीन मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भुमापन क्र. | क्षेत्र (हे. आर) | आकार |
|---|---|---|---|
| वावंजे | २०५/२, | ०–२३–५ | ३–८१ |

सदर जमीन मिळकत ही श्री. हरिश्चंद्र हिरामण मढवी व श्रीमती. जनाबाई गणेश मढवी व श्री. नारायण ढोमा मढवी यांचे सामाईक मालकी हिश्यातील आहे. सदर जमीनी मध्ये आज पर्यंत कोणत्याही प्रकारचे वाटण्या अथवा हिस्से झालेले नाहीत. सदरची मिळकत ही आमच्या सामाईक मालकी हक्कात व ताबे कब्जामध्ये आहे. सदर जमीनी मध्ये आमचे क्षेत्र वाटप झालेले नाही, तसेच ताबा देखिल सामाईक आहे.

सबब, सदर मिळकती बाबत कोणत्याही व्यक्तीने, संस्था कंपनीने किंवा विकासकाने कोणतेही खरेदी–विक्री व्यवहार, करार, करानामा, बंधपत्र, विकास करार इत्यादी करुन नये.

**ठिकाण–पनवेल**
**दिनांक–१६/०७/२०२५**

**सही/–**
**ॲड. चेतन जाधव**
पुष्पक सी एच.एस फ्लॅट नं ०२, प्रांत ऑफिस जवळ जुना ठाणा नाका रोड पनवेल जि. रायगड– ४१०२०६

## उपविभागीय अधिकारी माणगांव, उपविभाग माणगांव, जि. रायगड यांजकडून अधिसूचना

क्र.उविअ/भूसं/कात–२/रो.मा.औ.क्षे./निजामपूर/एस.आर.५७/२०११ – ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ३) चे कलम १, पोट–कलम (३) अन्वये महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. २००७/ (३३४) उद्योग – १४, अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे त्या अधिसूचनेच्या अनुसूचित विनिर्दीष्टीत करण्यात आलेल्या क्षेत्रास दिनांक १९ फेब्रुवारी, २००९ पासून लागू करण्यात आले आहेत;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाचे कलम ३२ अन्वये ज्या क्षेत्रात उपरोक्त अधिनियमाचे प्रकरण ६ लागू करण्यात आले आहे, त्या क्षेत्रातील जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास औद्योगिक किंवा उपरोक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी संपादन करण्याचा अधिकार महाराष्ट्र शासनास प्रदान केले आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे क्र. आयडीसी (१८९२)/१७४४१/उद्योग–१४, दिनांक ११ जून १९९३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे क्र. आयडीसी/२१०६/(४८५)/उ–१४, दिनांक १० नोव्हेंबर २००६ अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६२ च्या नियम २८ ने जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेले उपरोक्त नियमाची कलमे ३२, ३६ व ३८ चे अधिकार आणि नियमाचे कलम २ (क) अन्वये उप विभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव यांना कार्यान्वित करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत;

आणि ज्याअर्थी, सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेले क्षेत्र महामंडळास दिल्ली –मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडोर अंतर्गत रोहा माणगांव औद्योगिक क्षेत्रासाठी संपादन करण्यात आले असून महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(२), ३२(१), ३२(५) व कलम ३२(६) अन्वये कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे, तसेच जमीन मालकांना महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३३(३) अन्वये सर्वसाधारण/अनिवार्य निवाडे घोषित करून नुकसान भरपाई वाटपाबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे;

त्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(७) चा वापर करून अनुसूचित नमूद केलेल्या जमिनी उपरोक्त कारणासाठी संपादीत करून व ताब्यात घेवून ती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांजकडे हस्तांतरण करीत असल्याबाबतची अधिसूचना उपविभागीय अधिकारी माणगांव, उपविभाग माणगाव हे प्रसिध्द करीत आहेत.

**अनुसूची**
**रोहा – माणगांव औद्योगिक क्षेत्र**
**जिल्हा रायगड, ता. माणगांव, मौजे – निजामपूर**

| अ. क्र. | निजामपूर जुना सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | निजामपूर नविन सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | जमिनीचे क्षेत्र (हे. आर.) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | ४६ | २ | ४६ | २ | ०.०१८० |
| २ | ४७ | १ पैकी | ४७ | १ पैकी | ०.००३२ |
| ३ | ४९ | १ पैकी | ४८ | १ पैकी | ०.००६९ |
| ४ | ४९ | ४ पैकी | ४८ | ४ पैकी | ०.२३१८ |
| ५ | ५२ | १ पैकी | ५१ | १ पैकी | ०.३८३१ |
| ६ | ५२ | २ | ५१ | २ | ०.०१३० |
| ७ | ८७ | १ पैकी | ५५ | १ पै | ०.००२४ |
| ८ | ८७ | २(१) | ५५ | २(१) | १.७०२० |
| ९ | ८८ | १ | ५६ | १ | १.०८८० |
| १० | ८८ | २ | ५६ | २ | ०.०१५० |
| ११ | ८८ | ३ | ५६ | ३ | ०.००५० |
| १२ | ८८ | ४ | ५६ | ४ | ०.००५० |
| १३ | ९१ | ० | ५९ | ० | ०.३७४० |
| १४ | ९३ | १ पै | ६१ | १ पै | ०.१६५० |
| १५ | ९४ | १क | ६२ | १क | ०.२०२० |
| १६ | ९४ | २ | ६२ | २ | ०.०२३० |
| १७ | ९४ | ३ | ६२ | ३ | ०.३७९० |
| १८ | ९४ | ४ | ६२ | ४ | ०.०७६० |
| १९ | १०३ | १ पैकी | ७१ | १ पैकी | ०.३०९० |
| २० | १४६ | २ | ९९ | २ | ०.०९०० |
| २१ | १४७ | ० | १०० | ० | ०.२४०० |
| २२ | १४९ | ६ | १०२ | ६ | ०.३००० |
| २३ | १४९ | ७ | १०२ | ७ | ०.९३०० |
| २४ | १४९ | ९ पैकी | १०२ | ९ पैकी | ०.०१८० |
| २५ | १५० | १ | १०३ | १ | ०.५२०० |
| २६ | १५० | २ | १०३ | २ | ०.२७०० |
| २७ | १५१ | १ पैकी | १०४ | १ पैकी | ०.०१५५ |
| २८ | १५१ | २ | १०४ | २ | ०.०५०० |
| २९ | १५७ | २अ२ | ११० | २अ२ पै | ०.०८५० |
| ३० | १९७ | १ | १५० | १ | ०.०२०० |
| ३१ | १९७ | २ | १५० | २ | ०.२७३० |
| ३२ | १९८ | २ | १५१ | २ | ०.११४२ |
| ३३ | १९८ | ३ | १५१ | ३ | ०.०३०० |
| | | | | | **७.९५७१** |

**अनुसूची**
**रोहा – माणगांव औद्योगिक क्षेत्र**
**जिल्हा रायगड, ता. माणगांव, मौजे – एकलव्यनगर**

| अ. क्र. | निजामपूर जुना सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | एकलव्यनगर नविन सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | जमिनीचे क्षेत्र (हे. आर.) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | ५३ | पै | १८ | पै | १.६५२५ |
| २ | ५५ | ७ | २१ | ७ पैकी | ०,०४७० |
| ३ | ६० | १ | १३ | १ | ०.७४१० |
| ४ | ६४ | पैकी | ३३ | पैकी | ०.०३०० |
| ५ | ६५ | पैकी | ३५ | पैकी | ०,०७४४ |
| ६ | ६९ | २ पैकी | ४४ | २ पैकी | ०.०३७५ |
| ७ | ७१ | पैकी | ४६ | पैकी | ०,०००२ |
| ८ | ७३ | २ | ४९ | २पै | ०.०२३९ |
| ९ | ७८ | पैकी | १ | पैकी | ०,००३९ |
| १० | ७९ | पैकी | ७ | पैकी | ०.४३३२ |
| ११ | १३० | १ पैकी | २४ | १ पैकी | ०,०१६० |
| १२ | १३० | ३ पैकी | २४ | ३ पैकी | ०.०८५८ |
| १३ | १३० | ५ पैकी | २४ | ५ पैकी | ०.०१९० |
| १४ | १३० | १० पैकी | २४ | १० पैकी | ०.०४७२ |
| १५ | २०० | १ | ८ | १ | ०.११०० |
| १६ | २०१ | ० | ३ | ० | ०.१००९ |
| १७ | २०४ | १ पैकी | ३२ | १ पैकी | ०.०१०४ |
| १८ | २०४ | २ | ३२ | २ | ०.०३३० |
| १९ | २०४ | ५ पैकी | ३२ | ५ पैकी | ०.००६६ |
| २० | २०४ | ६ पैकी | ३२ | ६ पैकी | ०.००२५ |
| २१ | २०४ | ७ पैकी | ३२ | ७ पैकी | ०.००४४ |
| | | | | | **३.४७९४** |

**माणगांव**
**दिनांक :– १०/०७/२०२५**

**सही/–**
**(डॉ. संदीपान सानप )**
**उपविभागीय अधिकारी,**
**माणगांव उपविभाग, माणगांव**

**जिमाका/रायगड/जाहिरात /१०३/९७०/२०२५**

# एपीएमसी परिसरात सुविधांची वानवा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील एपीएमसी परिसरात लावलेले अद्ययावत सीसीटीव्ही कॅमेरे नागरिकांच्या सुरक्षेसाठी उपयुक्त ठरत असले तरी, त्याच वेळी पायाभूत सुविधांकडे झालेल्या दुर्लक्षामुळे लहान वाहनचालकांसाठी हे प्रकल्प त्रासदायक ठरत आहेत.

सीसीटीव्हीच्या वायरिंगसाठी मागील वर्षी रस्त्यांमध्ये खोदकाम करण्यात आले होते. त्यानंतर तात्पुरते काँक्रीटीकरण करण्यात आले असले तरी, पावसाळा सुरू होताच हे थर उखडून रस्त्यावर खड्डे पुन्हा वर आले आहेत. हे खड्डे लहान व्यावसायिक वाहन, टेम्पो आणि दुचाकीस्वारांसाठी धोक्याचे ठरत आहेत. वाहन वेगात आल्यास या खड्ड्यांवर आदळून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे.



सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा हा उपक्रम निश्चितच स्तुत्य असला, तरी त्यासाठी करण्यात आलेल्या खोदकामाचे परिणाम आजही नागरिकांना भोगावे लागत आहेत.

एपीएमसी परिसरात मालवाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणात अवजड वाहने ये–जा करत असतात. अशा वाहनांच्या वारंवार झालेल्या हालचालीमुळे या खड्ड्यांच्या आजूबाजूला आणखी लहानमोठे खड्डे तयार झाले आहेत.

सुरक्षा वाढली, पण रस्तेच अपघातप्रवण झाले, असे ताशेरे वाहनचालकांकडून प्रशासनावर ओढण्यात येत आहेत. नागरिकांनी महापालिकेकडे याबाबत तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली असून, लवकरात लवकर खड्डे बुजवून रस्ते पूर्ववत करावेत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

> **या रस्त्यांची पाहणी करण्यात आली असून, सहाय्यक अभियंत्यांना यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. पावसामुळे कामात थोडा अडथळा येत असला तरी शक्य तितक्या लवकर सर्व खड्डे बुजवण्यात येतील.**
> **–सागर मोरे,**
> **विभाग अधिकारी, तुर्भे**

# सारसोळे येथे मच्छीमार्केटचे लोकार्पण

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

सारसोळे गावातील मच्छीमार्केटची पुनर्बंधणी करून तिथे अद्यावत सर्वसुविधा युक्त मासळी मार्केटची निर्मिती करावी अशी मागणी करण्यात आली होती. त्याच अनुषंगाने बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या आमदार विकास निधीमधून सुमारे ७५ लाख रुपये निधी खर्च करून सारसोळे गावातील स्थानिक मच्छीमार महिलांकरिता भव्यदिव्य, असे कै. महादू रंग्या पाटील मासळी मच्छीमार्केट उभारले असून त्याचे उद्‌घाटन गुरुवार १० जुलै रोजी माजी नगरसेवक काशिनाथ पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले.



सारसोळे गावात पाण्याचे जळकुंभ, बहुद्देशीय इमारत, तरुणा करिता सुसज्ज व्यायाम शाळा, सोलर हायमास्ट व अन्य स्थापत्य कामाकरिता स्थानिक आमदार निधी उपलब्ध करून देणार असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी बोलताना सांगितले.

या वेळी नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, माजी नगरसेवक दिपक पवार, राजू शिंदे, जनार्दन सुतार, मनोज मेहेर, प्रल्हाद पाटील, संदीप मेहेर, सुर्यकांत तांडेल, जयेश मेहेर, राजू तिकोने, कुणाल महाडिक, भास्कर यमगर, जयवंत तांडेल, प्रवीण भगत, सुहासिनी नायडू, महादेव पवार, संगीता म्हात्रे, आकांक्षा म्हात्रे, श्याम पाटील, हितेश गामी, नेरूळ पोलीस स्टेशन वपोनि ब्राह्मनंद नाईकवाडी आदी उपस्थित होते.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या माध्यमातून शिक्षणासाठी नेहमीच मदत -अरुणशेठ भगत



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या माध्यमतून शिक्षणासाठी नेहमीच मदतीचा हात पुढे केला जातो. या संधीचा फायदा विद्यार्थ्यांनी अभ्यास करून घेतला पाहिजे, असे मार्गदर्शन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भघत यांनी नवीन पनवेल मध्ये वह्या वाटपाच्या कार्यक्रमावेळी केले.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळे हे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली दरवर्षी गरजू विद्यार्थ्यांसाठी वह्या वाटपाचा कार्यक्रम राबवला जातो. त्याअंतर्गत नवीन पनवेल मधील श्री संत साईबाबा प्राथमिक विद्यालयात भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला भाजपच्या उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, तालुका सरचिटणीस यतीन पाटील, माजी नगरसेवक वृषाली वाघमारे, जितेंद्र वाघमारे, मयुर कदम, अक्षय सिंग यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि उपस्थित होते.



**पनवेल : तारा गावातील भाणुबेन प्रवीन शहा माध्यामिक विद्यालाय व ज्युनियर कॉलेजमधील गरजू विद्यार्थ्यांना श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून वह्यांचे वाटप मंगळवारी करण्यात आले. हा कार्यक्रम पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला असून त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत वह्यांचे वाटप केले. या वेळी पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर, लीना पातील, अरुणा पाटील, आशा तळोजकर, युवानेते योगेश पाटील, मुख्याध्यापक अरुण कदम, प्रगती म्हात्रे, गजानन वर्तक, बुधवन सर यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.**

# लायन्स सरगमतर्फे क्रीडा प्रशिक्षकांचा सन्मान



**पनवेल : वार्ताहर**

सरगम लायन्स तर्फे दरवर्षी सातत्याने विविध क्षेत्रातील गुरुंचा सन्मान केला जातो आणि त्यांच्या कार्याची जाण ठेवली जाते ही मोठी कौतुकाची गोष्ट आहे असे उद्गार माजी प्रांतपाल मुकेश तनेजा यांनी काढले. ते लायन्स सरगम तर्फे नवीन पनवेल येथे गुरुपौर्णिमेनिमित्त झालेल्या क्रीडा प्रशिक्षकांच्या सन्मान सोहळ्यात बोलत होते. त्यांनी विविध उदाहरणे देऊन गुरुंचे आपल्या जीवनातील महत्त्व सांगितले.

या हृद्य सोहळ्यात विशेष अतिथी शिवछत्रपती पुरस्कार विजेते टेबल टेनिस प्रशिक्षक संजय कडू यांचा गौरव करण्यात आला त्याचबरोबर फुटबॉल प्रशिक्षक अक्षय साष्टे, कराटे प्रशिक्षक मंदार पनवेलकर, तायक्वांडो प्रशिक्षक प्राजक्ता अंकोलेकर, क्रिकेट प्रशिक्षक आप्पा पावसकर, बॅडमिंटन प्रशिक्षक डॉ. मिलिंद घरत यांना सन्मानित करण्यात आले.

विशेष अतिथी संजय कडू यांनी सरगम क्लबचे या आगळ्या कार्यक्रमाबद्दल कौतुक केले आणि भविष्यात त्यांच्याकडून नेहमीच सहकार्य मिळेल असे सांगितले. प्रशिक्षकांचे वतीने मंदार पनवेलकर, अक्षय साष्टे, प्राजक्ता अंकोलेकर यांनी ही आपले मनोगत व्यक्त करताना या सत्काराबद्दल भारावून गेल्याचे सांगितले आणि सरगम क्लबचे आभार मानले. अध्यक्ष प्रेमेंद्र बहिरा यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि या उपक्रमाच्या आयोजनाचे उद्दिष्ट सांगितले.

संजय गोडसे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर सहसचिव ओंकार खेडकर यांनी आभार मानले. या वेळी मोहिनी तनेजा, स्वाती गोडसे, अल्केश शहा, प्रदीप भट्टाचार्य, डॉ. मानदा पंडित, जयेश मणियार, संध्या महानुभाव, मिलिंद जोशी, अनिल परमार, सुषमा पन्हाळे, ॲड. सुनील देशपांडे तसेच अनेक क्रीडा प्रेमी उपस्थित होते.

# गरजू, गरीब विद्यार्थ्यांना वह्यावाटप

**पनवेल : वार्ताहर**

प्रभाग क्र.१७ मध्ये शिवाजीनगर झोपडपट्टी पनवेल या ठिकाणी शिवसेनेच्या माध्यमातून तसेच माजी नगरसेवक शिवसेना रायगड जिल्हा सल्लागारप्रमुख रमेश गुडेकर व माजी नगरसेवक पनवेल महानगरप्रमुख प्रथमेश सोमण यांच्या प्रयत्नाने पनवेल शहर प्रसिद्धी प्रमुख तोफिक बागवान व उपविभाग प्रमुख गुलाब बागवान यांनी वह्या वाटपाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रायगड जिल्हा सल्लागार प्रमुख मा.नगरसेवक रमेश गुडेकर आणि पनवेल शहर प्रमुख प्रसाद सोनवणे उपस्थित होते प्रभाग क्र.१७ चे शाखा प्रमुख अनिकेत जेसवाल शिवसैनिक रसूल बागवान, शैलेश शिंदे, उरली गावचे शाखा प्रमुख विवेक घाणेकर, दीपक प्रभू, सिद्धेश पवार, राहुल शिंदे, अविनाश डोकडे, रोशन पवार, ईशान बागवान, योगेश शिंदे, अभि पवार शिवसेना पदाधिकारी व विद्यार्थी पालक वर्ग उपस्थित होते.



# मराठा समाजातर्फे खांदा कॉलनीत विद्यार्थी-पालक गुणगौरव

**पनवेल : वार्ताहर**

सकल मराठा समाज मंडळ, खांदा कॉलनी यांच्या वतीने आयोजित विद्यार्थी–पालक गुणगौरव सोहळा २०२५ मोठ्या उत्साहात मराठा भवन, सेक्टर ९ खांदा कॉलनी येथे झाला. या कार्यक्रमात इयत्ता दहावी व बारावी मध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सन्मान करण्यात आला.




कार्यक्रमाची सुरुवात गुरुमंत्र यशाचा या विशेष शैक्षणिक मार्गदर्शन सत्राने झाली, ज्याचे मार्गदर्शन प्रा. गिरीश चव्हाण सर (वर्धिष्ण फाउंडेशन, खांदा कॉलनी) यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना यशाकडे नेणाऱ्या मार्गावर प्रेरणादायी विचार दिले. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून विधान परिषदेचे दमदार आमदार विक्रांत बाळासाहेब पाटील यांची उपस्थिती लाभली. त्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली आणि सकल मराठा समाज मंडळ खांदाकॉलनी च्या उपक्रमाचे कौतुक केले.

मराठा समाजाचे नेते रामदास शेवाळे, सामाजिक कार्यकर्ते रुपेश ठोंबरे यांनीदेखील मराठा भवन कार्यालयात उपस्थित राहून गुणगौरव कार्यक्रमाचे कौतुक केले. सकल मराठा समाज मंडळ खांदा कॉलनी चे सल्लागार रामचंद्र ढोबळे, शिवाजी दांगट, अध्यक्ष संतोष जाधव, सचिव सदानंद शिर्के यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले. विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा देखील विशेष सन्मान झाला. या उत्साही सोहळ्यास सकल मराठा समाज मंडळाचे सर्व सदस्य, पदाधिकारी व समाजबांधव, विध्यार्थी पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इंग्रजीमध्ये बोला पटकन पुस्तकाचे वाटप

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

इंग्रजीमधे बोला पटकन, सलाम चाऊस प्रकाशित पुस्तकाद्वारे इंग्रजी बोलायला शिकता येत नाही हा काही जणांचा समज अर्थात गैरसमज कायम दूर करणारे पुस्तक संतोष सुतार प्रतिष्ठान तर्फे नवी मुंबई शाळा क्रमांक १५ व १०१ शिरवणे गाव, नवी मुंबई येथे सहावी, सातवी, आठवी , नववीच्या सर्व विद्यार्थ्यांना सोमवारी मोफत वाटप करण्यात आले.



नवी मुंबई दिवसागणिक प्रगती करत आहे. नवी मुंबईत लवकरच एअरपोर्ट सुरू होणार असून अनेक उद्योगधंदे हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे होत आहेत. येथे स्थानिकांची जशी पीछेहाट झाली तशी आताच्या भावी पिढीची होऊ नये. या दृष्टीने इंग्रजीचे महत्त्व समजले म्हणून शाळेतल्या विद्यार्थ्यांना इंग्रजी मध्ये प्रगती करण्याकरता या पुस्तकांचे वाटप करण्यात आले असे अध्यक्ष संतोष सुतार यांनी सांगितले.

या वेळी बोलताना प्रमुख मार्गदर्शक प्रदीप पाटीलसर यांनी पुस्तक हेच खरे ज्ञान वाटून घेऊया आणि समृद्ध करूया जीवन असे सांगत आपल्या मातृभाषा सोबतच व्यवहारातील भाषाचे महत्व खूप आहे आणि सदर पुस्तकाचे रोज फक्त पंधरा मिनिटे सातत्याने अभ्यास केला तरी भविष्यात आपली इंग्रजी उत्तम होईल असे पाटील सर यांनी सांगितले.तर मनोज दातखिळे यांनी मुलांनी इंग्रजीमधे पटकन बोलावे, असे सांगून शिक्षणाचे महत्त्व अनेक उदाहरणांसह पटवून दिले.

या कार्यक्रमासाठी शाळेतील समन्वयक साळवी मॅडम, अमृत पाटीलसर सोबतच शिक्षक वृंदांनी मोलाचे सहकार्य केले. सर्व शिक्षकांच्या हस्ते उपस्थित विद्यार्थ्यांना इंग्रजीमधे बोला पटकन मोफत पुस्तक वाटप करण्यात आले.

# तोतया पोलिसांनी वृद्धाला लुबाडले

**नवी मुंबई:** परशुराम नारायण परब, वय ८२ वर्ष, हे जेष्ठ नागरिक सीबीडी परिसरातील सरोवर विहार परिसरात पायी चालत जात असताना, एक अनोळखी इसम त्यांच्याजवळ आला व तो पोलीस सब इन्स्पेक्टर असल्याचे सांगितले, पुढे मर्डर झाला असून सोने काढून पिशवीत ठेवा. असे सांगत परब यांची सोन्याची चैन एका कागदात गुंडाळली व त्यांना बोलण्यात गुंतवून हातचलाकीने चोरी केली. पुढे गेल्यावर काही वेळाने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच, परब यांनी सीबीडी पोलीस ठाण्यात अज्ञात तोतया पोलीस इसमाविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. या घटनेबाबत पुढील तपास सीबीडी पोलीस करत आहेत.

# १० लाखांचे ५५ मोबाईल पोलिसांनी केले परत

**नवी मुंबई : बातमीदार**

गुन्हे शाखा पोलिसांनी चोरीला गेलेल्या, गहाळ झालेल्या ५५ मोबाइलचा शोध घेऊन ते संबंधितांना शुक्रवारी परत केले. सुमारे १० लाख ५० हजार रुपये किमतीचे हे मोबाईल आहेत. गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाचे वरिष्ठ निरीक्षक सुनील शिंदे यांच्या पथकाने या कारवाया केल्या आहेत.

सहायक निरीक्षक श्रीनिवास तुंगेनवार, हवालदार सचिन टिके, दिलीप ठाकूर, राहुल वाघ,सोमनाथ काळे, नवनाथ पाटील, सतीश चव्हाण आदींच्या पथकांनी या मोबाइलचा शोध घेतला. मोबाइल हरवल्याच्या, चोरल्याचा अनेक तक्रारी पोलिसांकडे प्राप्त होत्या. त्यांचा तांत्रिक तपासातून शोध लावण्यात पोलिसांना यश आले आहे. दरम्यान, चोरीला गेलेले अनेक मोबाइल वापरात न आणता त्यांचे सुटे पार्ट विक्री होत असल्याने त्या मोबाइलचा छडा लावण्यात पोलिसांना अडचण निर्माण होत आहे.

# डॉ. गुणेंचे वाढदिवस अभीष्टचिंतन



**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील गरिबांचे देवदूत म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या डॉ. गिरीश गुणे यांचा वाढदिवस आज मोठ्या उत्साहात साजरा झाला. विविध सामाजिक,राजकीय आणि वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

त्यांना शुभेच्छा देण्यासाठी नगरसेवक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांची रीघ लागली होती. हजारो गरीबांवर मोफत उपचार करणाऱ्या डॉक्टर गुणेंना माणसातील देव म्हणून ओळखलं जातं आणि आज त्यांच्या जनसेवेबद्दल मनापासून कौतुक व्यक्त करण्यात आले. या वेळी सामाजिक कार्यकर्ते रमेश गुडेकर, ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, संजय कदम, हॉटेल व्यवसायिक श्री व सौ वाकडीकर यांनी डॉ.गिरीश गुणे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

# रोहा तालुक्यात मुसळधार पाऊस; कुंडलिका नदीवरील पूल वाहतुकीस बंद





**रोहे ,धटाव : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात मंगळवारी सकाळी पावसाने झोडपले. सकाळ पासुन विजेच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडत आहे. त्यामुळे डोंगर माथ्यावरून मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने कुंडलिका नदी दुथडी भरून वाहत होती.

सोमवारी सायंकाळी पावसाने सुरुवात केली असुन रात्रभर रिपरिप पाऊस पडत असताना मंगळवारी मात्र मुसळधार पाऊस पडण्यास सुरुवात झाली आहे. रोहा शहरात मुसळधार पावसामुळे रस्त्यावर पाणी आले होते. रोहा शहरातील कोर्ट रोड, दमखाडी नाक, सार्वजनिक बांधकाम कार्यालय, बाजारपेठ आदि ठिकाणी पाणी रस्त्यावर आले होते. रोहा कोलाड मार्गावर नवरत्न हॉटेल ते सरकार मिसळ दरम्यान रस्त्यावर पाणी आले होते. मुसळधार पावसामुळे रोहा तालुक्यातील शाळा महाविद्यालयांना सुट्टी देण्यात आली आहे. भुवनेश्वर किल्ला मार्गावर काही ठिकाणी पाणी असल्याने रोहा भुवनेश्वर किल्ला मार्ग रहदारीसाठी काही काळ बंद होते. मुसळधार पावसाने मुंबई गोवा महामार्गावरील आंबेवाडी नाक्याला तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. खांब नाक्यावर ही महामार्गांवर पाणीचपाणी दृश्य पाहवयास मिळाले आहे.

रात्रभर पाऊस पडत होता तर सकाळपासून पावसाने जोरदार बरसन्यास सुरुवात केली त्यामुळे डोंगर माथ्यावरील नदी नाले तुटुंब भरून वाहत आहेत रोह्याची कुंडलीका नदीने रौद्ररूप धारण केले असून नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात पाणी वाहत आहे या नदीवरील असलेले दोन्ही फुल काही वाहतुकीस बंद करण्यात आले

# पळचिल रस्त्यावर दरड कोसळून आले धबधब्याचे रूप

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाबळेश्वर गिरिस्थान आणि पोलादपूर तालुक्याच्या सह्याद्री डोंगररांगांमध्ये रात्रभर तुफान पाऊस सुरू असून सोमवारी संध्याकाळपासून मंगळवारी पहाटेपर्यंत तब्बल १०५ मिलिमीटर पाऊस झाल्याची नोंद तहसील कार्यालयातील आपत्ती निवारण कक्षातून देण्यात आली. तालुक्यातील पावसाची एकूण गोळाबेरीज १५७१ मिमी झाली असल्याने १५ जुलै च्या आतच यंदा दीड हजारी नोंद पार केली आहे. दरम्यान, पळचिल पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या रस्त्यावर दरड कोसळल्याने रत्नागिरी जिल्हा हद्दीतील दरीकडे धबधब्याचे रूप आले आहे.

सोमवारी सायंकाळपासून कोल्हापूर तालुक्याच्या विविध भागांमध्ये मुसळधार पाऊस सुरू झाला आहे. यामुळे ढवळी, कामथी, घोडवनी आणि चोळई या नद्यांचे पाणी सावित्री नदीच्या पात्राला मिळून सावित्री नदीचे पात्र अतिशय रुंदावले आणि पोलादपूर शहरात उत्तर वाहिनी म्हणून ओळखले जाणारी ही सावित्री नदी शहराच्या उत्तर दिशेच्या लोकवस्तीमध्ये पूर्ण सदृश परिस्थिती निर्माण करणारी ठरली.

शहरातील लेप्रसी मिशन हॉस्पिटलच्या लगतच्या पुलाखाली चोळई आणि सावित्री नदीच्या संगमामुळे पोलादपूर शहरातील जुने मटन मार्केट, सिध्देश्वर आळीतील शंकर मंदिर, गंगामाता घाट, श्रीराममंदिरासमोरील घाट, गणपती मंदिरासमोरील घाट पाण्याखाली गेले तर तेथून पुढे जुन्या वाचनालयाच्या इमारती पासून वाचनालयाच्या नवीन इमारतीलगत सार्वजनिक गणपती विसर्जनाच्या ठिकाणापर्यंत जुन्या महाबळेश्वर रस्त्यावर उत्तर वाहिनी सावित्री नदीच्या पुराचे पाणी आल्याने हा पूर बघायला दरवर्षीप्रमाणे यंदाही पोलादपूरकरांनी ठिकठिकाणी दुरूनच गर्दी केली होती.

रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांच्या सीमावर्ती भागामध्ये असलेल्या कातळी बंगला ते पळचिल रस्त्यावर डोंगरातून दरड कोसळली आहे सवाद, माटवण भागातही पूरस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झाल्याचे दिसून आले.

# रायगड जिल्हा मेडीकल कॉलेजच्या कामात स्वतः लक्ष घालणार- खासदार सुनील तटकरे

**अलिबाग: प्रतिनिधी**

रायगड जिल्हा मेडीकल कॉलेज अलिबाग तालुक्यातील उसर येथे होणार आहे. त्याच्या इमारतीला विरोध होत आहे. हे दुर्दैवी आहे. हे काम लवकर पूर्ण व्हायला हवे. आजवर मी या प्रकल्पाच्या कामात लक्ष घातले नाही . मात्र यापूढील काळात वैद्यकीय महाविद्यालयाचे काम लवकर मार्गी लागावे यासाठी मी स्वतः लक्ष घालणार असे , राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष रायगडचे खासदार सुनिल तटकरे यांनी सांगितले.

सोमवारी ( दि.१४) रायगड जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची ( दिशा) बैठक अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. या बैठकी नंतर आयोजित पत्रकार परिषदेतखासदार सुनिल तटकरे बोलत होते.

लोकहीताच्या प्रकल्पांमध्ये अडथळे आणणे योग्य नाही. या मेडिकला कॉलेजमुळे या परिसरात जळवपास हजार कोटींची शासकीय गुंतवणूक होणार आहे. त्यासाठी निधीही उपलब्ध आहे. या कॉलेजमुळे प्रकल्पग्रस्तांवर अन्याय होऊ नये या मताशी मी सहमत आहे. मात्र त्यासाठी मेडिकल कॉलेजच्या इमारतीचे काम होऊच नये अशी भूमिका कोणी घेत असेल तर ते योग्य नाही, असे तटकरे म्हणाले.



जिल्ह्याला पालकमंत्री नसल्याने जिल्ह्याच्या विकासकामांनवर काही प्रमाणात परिणाम होतो. प्रत्येक जिल्ह्याला पालकमंत्री असणे आवश्यक आहे. पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकांमध्ये जिल्ह्याच्या विकासाची दिशा ठरवली जात असते. सध्या रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री पद रिक्त असल्याने रायगड जिल्हा नियोजन समितीची बैठकच होऊ शकली नाही. ही वस्तुस्थिती आहे. रायगड जिल्हा पालकमंत्री पदाबाबत मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी लवकर निर्णय घ्यायला हवा असे खासदार तटकरे यांनी यावेळी स्पष्ट केले.

जिल्हा वार्षिक योजनेचा निधी अद्याप प्राप्त झाला नसला तरी तो लवकरच प्राप्त होईल, ज्याठिकाणी पालकमंत्री नाहीत त्या ठिकाणी निधी वितरण कश्या पध्दतीने व्हावे याबाबत तिन्ही पक्षांच्या नेत्यांनी एकत्र बसून धोरण ठरवले आहे याचा निर्णय झाला आहे असेही तटकरे यांनी सांगीतले.

रायगड किल्ल्याच्या विकासासाठी राज्यसरकारने रायगड प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे. माजी खासदार संभाजी राजे या समितीचे अध्यक्ष आहेत. एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात या समितीवर स्थानिक आमदारांची सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली स्थानिक लोकसभा सदस्याचा त्यात नियमानुसार समावेश असणे आवश्यक आहे, मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून या प्राधिकरणात सदस्य म्हणून स्थानिक लोकसभा सदस्याचा समावेश असावा अशी मागणी करणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले .

# चोंढी येथे विविध उपक्रमांसह डॉ. मुखर्जींची जयंती साजरी



**रेवदंडा : प्रतिनिधी**

भारत सरकारच्या क्रीडा व युवा कार्यक्रम मंत्रालयाच्या अंतर्गत मेरा युवा भारत, अलिबाग-रायगड आणि ओएसिसः बहुउद्देशीय समाजाभिमुख संस्था, रेवदंडा यांच्या संयुक्त विद्यमाने लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळाच्या स. म. वडके शैक्षणिक संकुलात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी : १२५ वर्षांचा वैचारिक वारसा या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने केल्यानंतर घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

पुढील टप्प्यात प्रमुख मार्गदर्शक प्रतिक कोळी आणि ओएसिस संस्थेचे स्वयंसेवक समन्वयक दर्श नागोटकर यांनी उपस्थितांचे उद्बोधन केले. शिवाय वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना गौरविण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप शालेय परिसरात पिंपळ, चिंच, सुपारी, सुबाभूळ आदी १९ रोपांची वृक्षलागवड करून करण्यात आला. या समग्र कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चोंढी शैक्षणिक संकुलाचे सहा.शिक्षक पी. बी. सोनवणे, प्रास्ताविक ए. पी. कर्वे तर आभार प्रदर्शन एस. ए. लोखंडे यांनी केले.

चोंढी येथील शैक्षणिक संकुलात आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ओएसिस संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रतीक कोळी होते. व्यासपीठावर शैक्षणिक संकुलाचे उपमुख्याध्यापक बी. जी. पाटील, सहा.शिक्षक जे. पी. पेढवी, वी. एम. काटे, जे. डी. राठोड, बी. एन. शिंदे तर ओएसिस संस्थेचे सहसंस्थापक प्रतीक पाटील, सहसचिव साहिल साळुंखे, वेदांती महाडिक उपस्थित होते.

# श्रीवर्धन 'रोठा सुपारी' निसर्गाच्या तडाख्यातून पुन्हा बहराकडे!

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

कोकण किनारपट्टीवर वसलेला श्रीवर्धन तालुका सुपारी उत्पादनासाठी ओळखला जातो. येथील श्रीवर्धन रोठा सुपारी ही खास जात पांढऱ्या मऊ गरामुळे, मोहक आकारामुळे आणि उत्कृष्ट चवीमुळे बाजारात हमखास चांगल्या दरात विकली जाते.मात्र २०२० साली आलेल्या निसर्ग चक्रीवादळाने या सुपारी बागायतदारांवर मोठे संकट आणले. तालुक्यातील सुमारे ७०% पोफळी (सुपारी) बागा उद्ध्वस्त झाल्या. उरलेल्या बागांमध्ये रोगराई, किडींचा प्रादुर्भाव वाढला. अनेक बागायतदार आर्थिक अडचणीत आले. २०१५-२०२० दरम्यान वार्षिक सुमारे ३.७५ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवणाऱ्या या क्षेत्राला जबरदस्त फटका बसला.

या आपत्तीला सामोरे जाताना श्रीवर्धन तालुक्यातील शेतकऱ्यांनी हार न मानता पुन्हा नव्या जोमाने रोठा सुपारीची लागवड सुरू केली. श्रीवर्धन सुपारी संशोधन केंद्र व नर्सरीतून आतापर्यंत ४५,००० रोपे खरेदी करण्यात आली आहेत. या नव्या लागवडीमुळे पुढील काही वर्षांत उत्पादन पुन्हा वाढेल, असा विश्वास शेतकऱ्यांना वाटतो.

रोठा सुपारी लागवड ही अत्यंत शिस्तबद्ध आणि मेहनतीची प्रक्रिया आहे. ६-७ वर्षांनी फळधारणा होते. योग्य ओलावा, पाण्याचा निचरा आणि हवामानानुसार शिपणं (पाणी सोडणे) आवश्यक. पाण्याचा अभाव झाल्यास फळगळ, तर जास्त पावसात फळ तडकते. सुरुवातीला ४ वर्षे कुंपण घालून गुरे-ढोरांपासून रोपे सुरक्षित ठेवावी लागतात. उन्हाच्या तीव्रतेपासून संरक्षणासाठी छाया व्यवस्था करावी लागते. योग्य पाणी व खत मिळाल्यास सातव्या वर्षांपासून दर्जेदार सुपारी मिळते.

श्रीवर्धन सुपारी संशोधन केंद्र या नव्या मोहिमेत मार्गदर्शक ठरत आहे. ४५,००० नव्या रोपांपासून दरवर्षी १३०-१४० मेट्रिक टन उत्पादन अपेक्षित आहे, असे केंद्राचे अधिकारी डॉ. सिद्धेश सावंत यांनी सांगितले. यावर्षी तयार केलेल्या १०,००० रोठा सुपारी रोपांपैकी १,५०० रोपे आधीच विकली गेली .समुद्रकिनाऱ्यावरील गाळाची, निचरा होणारी, बारमाही ओलावा असणारी जमीन सुपारीसाठी उत्तम. २०-३५ सेल्सिअस तापमान योग्य. नैसर्गिक आपत्तीपूर्वी वार्षिक ६२६.१७ मेट्रिक टन उत्पादन. हेक्टरमागे २.२५ मेट्रिक टन उत्पादकता. पांढऱ्या, मऊ गरामुळे बाजारात उत्कृष्ट मागणी.

संशोधन केंद्रातील दर्जेदार रोपे, तांत्रिक मार्गदर्शन, आधुनिक पद्धती – या सर्वांच्या मदतीने पुढील ५-७ वर्षांत श्रीवर्धन तालुका पुन्हा सुपारी उत्पादनात भरभराटीला येईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञानाचा वापर या सर्वांचा योग्य मेळ साधला, तर श्रीवर्धन रोठा सुपारी केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देश-विदेशातही आपली खास ओळख निर्माण करेल!

# वरसे येथील पाककला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**रोहे : प्रतिनिधी**

महीलांच्या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाले आहे. बक्षिस मिळणार आहे, पण प्रत्येकांनी स्पर्धेत सहभाग भाग घेणे महत्वाचे आहे.प्रत्येकांने चांगले पदार्थ तयार केले असुन आपल्या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन करत आहे, असे प्रतिपादन वेदांती तटकरे यांनी व्यक्त केले.



खा.सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त महीला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व माजी आ. अनिकेत तटकरे यांच्या संकल्पनेतून राष्ट्रवादी महीला आघाडी व वरसे ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायतीच्या सभागृह येथे पाककला स्पर्धा आयोजित करण्यात आले होते. या वेळी या स्पर्धेत सहभागी महीलांचे कौतुक करताना वेदांती तटकरे बोलत होत्या

वरसे येथे आयोजित महीलांच्या पाककला स्पर्धेला महीलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असुन या स्पर्धेत २२५ च्या आसपास महीला स्पर्धक सहभागी झाल्या होत्या.पाककला स्पर्धेमुळे पदार्थांचा सभागृहात घमघमाट सुटला होता.

कार्यक्रमावेळी सरपंच रामाशेठ म्हात्रे, उपसरपंच मयुरी पडवळ, महीला तालुका अध्यक्ष प्रितम पाटील, सदस्य नरेश पाटील, अमित मोहीते, उतेश कांबळे, विभा चोरगे, समीर देवरे, संजय पाटील, मिनल देशमुख, अतिश पडवळ, सरपंच गीता मोरे, कविता शेळके, यामीनी पाटील, मीनल जाधव, सारीका दळवी, शुभांगी पेणकर, सरीता पालांडे, संजीवनी माने, मानसी क्षीरसागर, राजश्री पाटील, आदि मान्यवर उपस्थित होते.

# २५ वर्षांनंतर पुन्हा तीच शाळा... तीच मैत्री....स्नेहमेळाव्यात आठवणींना उजाळा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

ज्ञानदीप सेवा मंडळ हायस्कूल येथे २५ वर्षांनंतर एस.एस.सी. बॅच २००१ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात आणि आनंदात पार पडला. स्नेहमेळाव्यासाठी २००१ च्या एस.एस.सी. बॅचचे अनेक विद्यार्थी दूरदूरहून उपस्थित राहिले.



मुख्य पाहुणे म्हणून शाळेचे अध्यक्ष रविंद्रजी नाईक, निवृत्त मुख्याध्यापीका शोभना पाटील , शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश पाटील, इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक रत्नाकर तांडेल, माधुरी नारखेडे , दयाराम शिंदे आणि विलास जाधव ,हरेश तांडेल, सुरेश चव्हाण रमेश आहिरे,वनिता जाधव,मच्छिंद्र तांडेल यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आणि मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थ्यांनीही त्यांच्या मनोगताद्वारे यशोगाथा सांगितल्या तसेच शिक्षक आणि शाळेच्या योगदानाबद्दल आभार मानले.

कार्यक्रमात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, गेम्स आणि छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. सर्व माजी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर इतक्या वर्षानंतर शिक्षकवर्ग, जुने मित्र भेटल्याचा आनंद, समाधान जाणवत होता.

या स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने माजी विद्यार्थ्यांनी शाळेचे अध्यक्ष,शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह देऊन यथोचित सत्कार केला.सोबतच एकत्र येऊन ' शाळेसाठी पुस्तके, पुस्तकं ठेवण्यासाठी कपाट आणि ऑर्गन' भेटवस्तू म्हणून दिले तसेच आजच्या दिवसाची आठवण म्हणून सर्व माजी विद्यार्थ्यांनाही भेट स्वरूपात सन्मानचिन्ह दिले गेले.यावेळी कार्यक्रमाची सांगता स्वादिष्ट भोजन आणि सामूहिक छायाचित्राने करण्यात आली.

# कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या हितासाठी आमदार महेंद्र थोरवे यांच्याशी संवाद

**चौक : प्रतिनिधी**

कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या हितासाठी आमदार महेंद्र थोरवे यांची अखिल कोयना पुनर्वसाहत सेवा संघाचे कार्याध्यक्ष अर्जुन कदम, रायगड चे माजी अध्यक्ष पवन कदम, जेष्ठ नेते राजाराम मुसळे, किसन भोसले, अंकुश मोरे यांनी कर्जत येथील कार्यालयात भेट घेऊन चर्चा केली.



कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या न्याय मागण्या व हितासाठी आमदार महेंद्र थोरवे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बरोबर दोन बैठका आयोजित करून समस्या सोडविण्यासाठी मार्ग काढण्याचे आवाहन केले होते, त्यास माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महत्वाचे सहकार्य केले आहे, मार्च महिन्यात रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याबरोबर पनवेल येथे बैठक घेऊन आमदार महेंद्र थोरवे यांनी कोयना प्रकल्पग्रस्त रायगड जिल्ह्याचा आढावा घेतला होता, त्याची पूर्तता आणि शासकीय वरिष्ठ स्थरावर प्रलंबित मागण्यांचा पाठपुरावा करण्यासाठी ही भेट होती, असे रायगड जिल्हा माजी अध्यक्ष पवन कदम यांनी सांगितले.

राज्य सरकार कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या हितासाठी सकारात्मक असल्याचे आमदार महेंद्र थोरवे यांनी सांगितले, सद्या पावसाळी अधिवेशन सुरू असून, हे अधिवेशन संपताच रायगड जिल्हाधिकारी यांच्या बरोबर बैठक आयोजित करून रायगड जिल्ह्याचा आढावा घेण्यात येईल, आणि त्यानंतर पुनर्वसन मंत्री आणि पुनर्वसन सचिव यांच्या बरोबर बैठक घेण्यासाठी मी, प्रयत्न करून संपूर्ण कोयना प्रकल्पग्रस्त यांच्यासाठी ही मागणी असेल असे त्यांनी सांगितले. आमदार महेंद्र थोरवे हे अधिवेशन काळात व्यस्त असून देखील खालापूर तालुक्यातील कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या हितासाठी प्रामाणिक प्रयत्न करीत असल्याचे ज्येष्ठ नेते राजाराम मुसळे व किसन भोसले यांनी प्रतिनिधी यांच्याशी बोलताना सांगून आमच्या गावाला आमदार भेट देणार असल्याचे सांगितले.

# ‘फिफा’ क्लब विश्वचषक स्पर्धेत चेल्सीला विजेतेपद

**एपी, ईस्ट रुदरफोर्ड : वृत्तसंस्था**

कोल पाल्मरच्या दोन गोलच्या जोरावर चेल्सीने युरोपीय विजेत्या पॅरिस सेंट-जर्मेन संघावर अंतिम सामन्यात ३-० असा विजय मिळवत ‘फिफा’ क्लब विश्वचषक फुटबॉल स्पर्धेचे जेतेपद पटकावले. त्याला जोआओ पेड्रोने एक गोल करीत चांगली साथ दिली.



सामन्याच्या सुरुवातीपासूनच चेल्सीने आक्रमक खेळ केला. २२व्या मिनिटाला चेल्सीला आघाडी घेण्याची संधी मिळाली. त्यांच्याकडून पाल्मरने गोल करीत संघाला १-० असे आघाडीवर नेले. यानंतर आठ मिनिटांनी पाल्मरने आणखी एक गोल करीत संघाची आघाडी २-० अशी भक्कम केली. यानंतर ४३व्या मिनिटाला पेड्रोने पाल्मरच्या पासवर पॅरिस सेंट-जर्मेनचा गोलरक्षक जियानलुइगी डोनारुम्माला चकवित गोल करीत संघाला ३-० अशा स्थितीत पोहोचवले. पेड्रोचा दोन जुलैनंतर चेल्सी संघासोबत आल्यानंतरचा हा तिसरा गोल ठरला.

दोन वर्षांपूर्वी मँचेस्टर सिटीकडून चेल्सीसोबत आलेल्या पाल्मरने या हंगामात १८ गोल केले आहेत. पॅरिस सेंट-जर्मेन संघाने सामन्यात पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, मात्र चेल्सीच्या भक्कम बचावफळीसमोर त्यांचा निभाव लागला नाही. त्यांना सामन्यातील अखेरची काही मिनिटे दहा खेळाडूंसह खेळावे लागले. कारण, सामन्याच्या ८४व्या मिनिटाला मार्क कुकुरेलाचे केस पकडून पाडल्याने जोआओ नेवेसला लाल कार्ड दाखविण्यात आले. त्यामुळे त्याला मैदानाबाहेर जावे लागले. या स्पर्धेपूर्वी पॅरिस सेंट-जर्मेन संघ चांगल्या लयीत होता. त्यांनी या सत्रात लीग-१, कूप डी फ्रान्स आणि आपले पहिले चॅम्पियन्स लीग जेतेपद मिळवले होते. ते हंगामात आपले चौथे जेतेपद मिळवण्याच्या प्रयत्नात होते, मात्र त्यांना यामध्ये अपयश आले.

मेटलाइफ स्टेडियम येथे झालेला अंतिम सामना पाहण्यासाठी ८१,१८८ चाहत्यांची उपस्थिती होती. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंपही सामना पाहण्यासाठी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विजेत्या संघाला चषक देण्यात आला.

चेल्सी यापूर्वी प्रीमियर लीगमध्ये चौथ्या स्थानी राहिली होती आणि ‘युएफा’ कॉन्फरन्स लीगचे त्यांनी जेतेपद मिळवले होते. यापूर्वी, पॅरिस सेंट-जर्मेनला चॅम्पियन्स लीगच्या ऑक्टोबर २०२३च्या सामन्यात न्यूकॅसल संघाकडून ४-१ अशा तीन गोलच्या फरकाने पराभूत व्हावे लागले होते.

> **जेतेपदाची भावना ही वेगळी असते. सामना सुरू होण्यापूर्वी अनेकांना आमच्या कामगिरीवर शंका होती. मात्र, आम्ही आमचा खेळ करीत विजय नोंदवला. संघाने सर्वच आघाड्यांवर चांगली कामगिरी करताना पॅरिस सेंट-जर्मेनला पुनरागमन करण्याची संधी दिली नाही.**
> **-कोल पाल्मर**

# वैभव सूर्यवंशीची आता गोलंदाजीत कमाल!

## कसोटीत रचला इतिहास

**लंडन : वृत्तसंस्था**

१४ वर्षीय वैभव सूर्यवंशी याने इंग्लंड दौऱ्यातील १९ वर्षांखालील वनडे मालिकेत फलंदाजीत आपली धमक दाखवून दिली. पाच सामन्यांच्या मालिकेत ३५५ धावा करत तो या स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारा बॅटर ठरला. एवढेच नाही तर ५५ चेंडूतील शतकी खेळीसह त्याने वर्ल्ड रेकॉर्डही सेट केला. आता कसोटीत त्याने गोलंदाजी करताना इतिहास रचला आहे.



वनडे मालिकेनंतर भारत अंडर १९ विरुद्ध इंग्लंड अंडर १९ संघात कसोटी सामना खेळवण्यात येत आहे. या कसोटी सामन्यात वैभव सूर्यवंशी याने गोलंदाजी करताना एक विकेट घेतली. ही विकेट आपल्या खात्यात जमा करताच वैभवच्या नावे खास रेकॉर्डची नोंद झाली आहे.

वैभवने १९ वर्षांखालील इंग्लंड संघाचा कर्णधार हमजा शेख याच्या रूपात कसोटीत पहिली विकेट घेतली. यासह यूथ टेस्टमध्ये सर्वात कमी वयात विकेट घेणारा तो भारतीय गोलंदाज ठरला आहे. वैभवने १४ वर्षे १०७ दिवस वयात ही विकेट घेतली.

# युनिफाईट स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंची बाजी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सोलापूर येथे झालेल्या बारावी युनिफाईट राज्यस्तर स्पर्धेत रायगड जिल्हा प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरला आहे. सोलापूर सिंहगड इन्स्टिट्युट येथे या स्पर्धेचे आयोजन युनिफाईट वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र व सोलापूर यांनी केले होते. या स्पर्धेत महाराष्ट्रातून सुमारे २० जिल्ह्यातील खेळाडूंनी सहभाग घेतला.

स्पर्धेत वीर मुंबरकर, सोहम पडवळ, वेदांत धोत्रे, श्लोक पाटील, समित घावटे, पार्थ बागवे, आदर्श कानु, समर्थ शेंबड, हेम लाला, वेदांत चव्हाण, कथीर दुराई, सार्थक कांबळे, यशोधन सोनकांबळे, आर्यन शिंदे, साक्षी मर्ढेकर, समीक्षा परब, वेदिका मोरे, रिद्धी गायकवाड, श्रुती वायभसे, ज्ञानेश्वरी शेळके यांनी सुवर्ण; शिवप्रेम जुवाले, रूद्र वाव्हळ, वैष्णवी मर्ढेकर यांनी रौप्य; तर अर्णव वाघमारे, विवेक रावल, तनिष्क राहतवाल, अंश पाटील, शिवांश चंदनशिव, आयुरी धुमाळ, आस्था यादव यांनी कांस्यपदक जिंकले.

खेळाडूंना रायगड जिल्हा प्रतिनिधी युनिफाईट असोसिएशन व मुख्य प्रशिक्षक प्रशांत गांगर्डे, इतर प्रशिक्षक रवींद्र, रोहित भोसले, आलोक निर्मल यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूंचे युनायतेड शोतोकान कराटे असोसिएशन, रायगड युनिफाईट असोसिएशन तसेच भाजप अनुसूचित जाती सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष व माजी जि.प. सदस्य अमित जाधव यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले तसेच पुढील राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल शुभेच्छा देण्यात आल्या.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र युनिफाईटचे अध्यक्ष संतोष खंदारे, सचिव मंदार पनवेलकर, सोलापूर युनिफाईटचे अध्यक्ष इंगळे, सचिव बाळगे, खजिनदार इकबाल शेख यांनी मेहनत घेतली.



# लॉर्ड्स कसोटीत १४ फलंदाज त्रिफळाचीत

## २१व्या शतकात पहिल्यांदाच घडला असा विक्रम

**लंडन : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघ मैदानात उतरल्यावर एखादा विक्रम घडला नाही, असे क्वचितच होते. भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या कसोटी मालिकेतील तिसऱ्या सामन्यात जे घडले, ते २१व्या शतकात प्रथमच पाहायला मिळाले. लॉर्ड्स कसोटीच्या पाचव्या दिवशी जोफ्रा आर्चरच्या चेंडूवर ऋषभ पंत त्रिफळाचीत होताच एक नवा इतिहास रचला गेला. गेल्या जवळपास २५ वर्षांत प्रथमच असे काहीतरी पहायला मिळाले, ज्यात भारतीय संघाचा स्टार खेळाडू पंत याचा मोठा वाटा ठरला.



लॉर्ड्सवर भारत आणि इंग्लंड यांच्यात तिसरा कसोटी सामना सुरू झाला, तेव्हा पुढे काय घडणार आहे याची कोणालाही कल्पना नव्हती. या सामन्याच्या पाचव्या दिवशी दुसऱ्या डावात ऋषभ पंत बाद होताच या सामन्यात त्रिफळाचीत होणाऱ्या फलंदाजांची संख्या १४वर पोहोचली. २००० सालापासून म्हणजेच गेल्या जवळपास २५ वर्षांत कोणत्याही एका सामन्यात १४ फलंदाज त्रिफळाचीत होण्याची ही पहिलीच वेळ होती. या विक्रमात भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांच्या खेळाडूंचा समावेश आहे.

भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यातील तिसरा सामना आणखी एका कारणामुळे महत्त्वाचा ठरला, कारण दोन्ही संघांनी पहिल्या डावात समान धावा केल्या; एकही धाव जास्त नाही आणि एकही धाव कमी नाही. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडने ३८७ धावा केल्या होत्या. त्यानंतर भारतीय संघानेही प्रत्युत्तरात ३८७ धावाच केल्या. एका क्षणी भारतीय संघ काही धावांची आघाडी घेईल, अशी अपेक्षा होती, परंतु त्याच धावसंख्येवर भारताचा डावही संपुष्टात आला. कसोटीच्या पहिल्या डावात दोन्ही संघांनी समान धावसंख्या उभारण्याची घटनादेखील जवळपास १० वर्षांनंतर घडली.

भारत आणि इंग्लंड यांच्यातील या दीर्घ मालिकेतील केवळ तीनच सामने झाले असून अजून दोन सामने बाकी आहेत. मालिकेतील चौथा सामना २३ जुलैपासून मँचेस्टर येथे खेळवला जाईल. त्यानंतर अखेरचा सामना होईल. आता उर्वरित दोन सामन्यांमध्ये आणखी कोणते विक्रम रचले जातात, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# मोहम्मद सिराजवर आयसीसीची कारवाई

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये तिसऱ्या कसोटीत दोन्ही संघातील खेळाडूंमध्ये वातावरण तापले. सामन्यातील तिसऱ्या दिवसाच्या शेवटी हॅरी ब्रुकने फलंदाजी करताना वेळ वाया घालवला होता. त्यामुळे कर्णधार शुबमन गिल ब्रुक आमनेसामने आले. याचे पडसाद सामन्यातील चौथ्या दिवशी दिसले. बेन डकेटला बाद केल्यानंतर मोहम्मद सिराजने आक्रमक सेलिब्रेशन केले होते. त्यामुळे आयसीसीने सिराजवर कारवाई केली आहे.

लॉर्ड्स कसोटीतील चौथ्या दिवशी गोलंदाजी करताना मोहम्मद सिराजने बेन डकेटला बाद करत माघारी धाडले. यानंतर सिराज डकेटजवळ गेला आणि आक्रमक सेलिब्रेशन करताना दिसून आला. यादरम्यान तो डकेटला काहीतरी म्हणाला. हे आयसीसीच्या आचारसंहितेच्या नियमाच्या विरोधात आहे. आयसीसीने दिलेल्या माहितीनुसार हा कोड ऑफ कंडक्ट लेव्हल १मधील आर्टीकल २.५चे उल्लंघन आहे.

# महिलांसाठी पंच प्रशिक्षण व परीक्षा

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने पुढील ऑगस्ट अथवा सप्टेंबरमध्ये प्रथमच महिला क्रिकेट पंच प्रशिक्षण व परिक्षेचे आयोजन केले जात आहे. लेखी, तोंडी व प्रात्याक्षिके अशा स्वरुपात ही परीक्षा होणार आहे.

ही परीक्षा ही राज्यस्तरीय अजून महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन राज्य पॅनेलवर पंचांची नियुक्ती करण्यासाठी होणार आहे.

नोंदणी-रायगड जिल्ह्यातील इच्छुक आजी,माजी महिला खेळाडू आणि क्रिकेटच्या जाणकारांनी १८ जुलै पर्यंत खालीललिंकवर https://forms.gle/NY7oBwvkobyT4ukK- रु.५९० नोंदणी शुल्क भरून आपली नोंदणी करावी असे आवाहन रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदिप नाईक यांनी केले आहे. परीक्षेपूर्वी ऑगस्ट महिन्यात आठ दिवसांच्या कालावधीत क्रिकेट-लॉवर आधारीत महिलांसाठी ऑनलाईन अथवा ऑफलाईन पध्दतीने कोर्सचे आयोजन केले जाईल व त्यानंतर ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस अथवा सप्टेंबर महिन्याच्या सुऊवातीला लेखी, तोंडी व प्रात्याक्षिके अशा स्वऊपात परीक्षा घेतली जाणार आहे. पंच परीक्षेसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सहसचिव जयंत नाईक ९५६१०९९७३५ सदस्य अ‍ॅड. पंकज पंडित ८१४९२५२८२९, शंकर दळवी ९४२२५९४४१४१ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पोलार्डची सर्वाधिक टी-२० फायनल जिंकण्याच्या विश्वविक्रमाशी बरोबरी



**टेक्सास : वृत्तसंस्था**

एमआय न्यूयॉर्कच्या संघाने मेजर लीग क्रिकेट २०२५ स्पर्धेतील फायनल जिंकत जेतेपदावर नाव कोरले. मुंबई इंडियन्स फ्रँचायझी संघाच्या विजयासह या ताफ्यातून खेळणाऱ्या कॅरेबियन स्टार केरॉन पोलार्डने वर्ल्ड रेकॉर्डची बरोबरी साधली आहे.

३८ वर्षीय केरॉन पोलार्ड आता संयुक्तरित्या सर्वाधिक टी-२० फायनल जिंकणारा खेळाडू ठरला आहे. तो आतापर्यंत ३० टी-२० फायनल खेळला असून १७व्या वेळी त्याने फायनल जिंकली आहे. पोलार्डने आपलाच सहकारी ड्वेन ब्रावो याच्या वर्ल्ड रेकॉर्डशी बरोबरी केली.

पाकिस्तानी शोएब मलिकचाही या यादीत समावेश आहे. त्याने २२पैकी १६ टी-२० फायनल जिंकल्याचा रेकॉर्ड आहे. हिटमॅन रोहित शर्माने १८ वेळा टी-२० फायनल खेळताना ११ वेळा विजय मिळवल्याची नोंद आहे. कॅरेबियन अष्टपैलू सुनील नरेनही टॉप ५मध्ये आहे. त्याने १२ टी-२० फायनलमध्ये ११ वेळा त्याने बाजी मारली आहे.

# नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ व एनआयपीएम रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन शनिवार (दि.१२) ते रविवार (दि.१३) या कालावधीत सिडको समाज मंदिर सेक्टर १८ नवीन पनवेल येथे महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती राज्य पुरस्कार विजेते संजय सुदाम कडू यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली.



स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी आमदार विक्रांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले तर बक्षीस वितरण समारंभ एनआयपीएम रायगडचे अध्यक्ष किशोर शेळके व खजिनदार प्रविण करकरे तसेच टेबल टेनिस खेळाडू अशोक जानकर यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेचे चीफ रेफ्री पराग अंकोलेकर साळस्कर व शामल यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली होती.

### विजयी स्पर्धक

बीगनर्स मुली-विजयी मानसी टोकले नवी मुंबई, उपविजयी ईहा सिंह नवी मुंबई; बीगनर्स मुले-विजयी आराध्या पराटे नवी मुंबई, उपविजयी कपिष मित्तल नवी मुंबई; ११ वर्षाखालील मुले-विजयी अर्णव साळवकर विसपुते स्कूल नवीन पनवेल, उपविजेती आराध्या पाटील पेण; ११ वर्षाखालील मुली-विजयी आराध्या शेट्टी रेड क्लिफ स्कूल कामोठे, उपविजे दक्षता मुजुमदार रेड क्लिफ स्कूल कामोठे; १३ वर्षाखालील मुली-विजयी श्रेया जानकर सीकेटी स्कूल नवीन पनवेल, उपविजयी त्रिशा पावशे डीएव्ही पब्लिक स्कूल नवीन पनवेल; १३ वर्षाखाली मुले-विजयी अद्वैत पाटील न्यू होरायझन नवीन पनवेल, उपविजेते अश्विक चव्हाण डीएव्ही पब्लिक स्कूल नवीन पनवेल; १५ वर्षाखालील मुली-विजयी श्रेया जानकर सीकेटी स्कूल नवीन पनवेल, उपविजे त्रिशा पावशे डीएव्ही पब्लिक स्कूल नवीन पनवेल; १५ वर्षाखालील मुले-विजयी रेयांश साहू बालभारती स्कूल खारघर, उपविजयी मंदार राणे नवी मुंबई; १७ वर्षाखालील मुली-विजयी श्रेया जानकर सिकेटी स्कूल नवीन पनवेल, उपविजय रुद्रा सरवणकर सेंट सेंट जोसेफ स्कूल नवीन पनवेल; १७ वर्षाखालील मुले-विजय रेयांश शाहू बालभारती स्कूल खारघर, उपविजयी निल राठोड महात्मा स्कूल खांदा कॉलनी; १९ वर्षाखालील मुली-विजयी रुद्रा सरवणकर सेंट जोसेफ स्कूल नवीन पनवेल, उपविजेती श्रेया जानकर सीकेटी स्कूल नवीन पनवेल; १९ वर्षाखालील मुले-विजयी रेयांश साहू बालभारती स्कूल खारघर, उपविजे सय्यद आयान डीपीएस स्कूल पलस्पे; महिला-विजयी श्रेया अशोक जानकर सीकेटी स्कूल नवीन पनवेल, उपविजेयी रुद्रा राजेश सरवणकर; व्हेटरन पुरुष-विजयी शक्ती कुमार ओएनजीसी, उपविजे प्रमोद कुमार नवीन पनवेल; पुरुष-विजय पियांकुश बॉस उलवे, उपविजे आदित्य पनवेल, सेमी फायनल लिस्ट सनी पाटील नवीन पनवेल, फायनल लिस्ट मैत्रेय सचिन नाईक पनवेल.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com